cmyk

## संपादकीय

### दहशतवाद पोसण्यासाठीच हातभार !

भारत आणि पाकिस्तान संघर्ष शिगेला पोहोचला असतानाच पाकिस्तानला नवा मित्र मिळाला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफ हे त्याचे नाव. गेल्या आठवड्यातच आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलरचे कर्ज दिले होते. आता पुन्हा पाकला १.०२ अब्ज डॉलर म्हणजे ८४०० कोटी रुपयांचा दुसरा हप्ता देण्यात आल्याची बातमी आहे. पाकिस्तानला दिल्या जाणार्या कर्जाच्या संदर्भात आयएमएफची बैठक झाली होती. त्यात भारताने हे कर्ज देण्यास विरोध केला होता. त्याचे कारण जगाला माहिती आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५ | सोमवार, दि.१९ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### हैदराबादमधील चारमिनारजवळ भीषण आग, ८ मुलांसह १७ जणांचा होरपळून मृत्यू

हैदराबादः हैदराबादमधील ऐतिहासिक चारमिनारजवळील गुलजार हौज परिसरात रविवारी (दि.१८) सकाळी भीषण आग लागली. निवासी आणि व्यावसायिक वापराच्या इमारतीला लागलेल्या आगीत किमान १७ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. दुर्घटनेत अनेकजण जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आग सकाळी सुमारे साडेसहा वाजण्याच्या सुमारास लागली, ज्याचे संभाव्य कारण शॉर्ट सर्किट असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुलजार हौज परिसरातील ही इमारत निवासी आणि व्यावसायिक दोन्ही प्रकारची होती. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने तातडीने ११ बंब घटनास्थळी पाठवले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली.

# ‘वनामकृवि’च्या बियाणे विक्रीस प्रारंभ

## सोयाबीन, तूर, मूग, कपाशी बियाणे विक्रीस

| पीक | प्रतिकिलो दर | बॅगचे वजन | बॅग किंमत |
|---|---|---|---|
| सोयाबीन | १०० रुपये | २६ किलो | २६०० रुपये |
| तूर (गोदावरी) | २५० रुपये | ६ किलो | १५०० रुपये |
| तूर (गोदावरी) | २५० रुपये | २ किलो | ५०० रुपये |
| मूग | २२० रुपये | ६ किलो | १३२० रुपये |
| कपाशी (बीटी वाण) | १०० रुपये | १ किलो | १०० रुपये |
| कपाशी (पीए १०१) | ३०० रुपये | २.२५ किलो | ६७५ रुपये |
| ज्वारी (परभणी शक्ती) | १२५ रुपये | ४ किलो | ५०० रुपये |



**परभणी । प्रतिनिधी**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या व विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर उत्पादित केलेल्या सोयाबीन, तूर, मूग, कपाशी बियाण्याच्या विक्रीचा प्रारंभ विद्यापीठाच्या ५३ व्या वर्धापनदिनी रविवारी (दि. १८) सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.**

सोयाबीनच्या विविध वाणांच्या बियाणे बॅगची उपलब्धतेत एमएयूएस-१६२ (७५१ बॅग), एमएयूएस-१५८ (३०० बॅग), एमएयूएस- ७१ (३७६ बॅग) हे उपलब्ध आहेत. तुरीच्या बीडीएन-७१६ (लाल) वाणाच्या ३०० बॅग, बीडीएन-७११ (पांढरी) वाणांच्या ३०० बॅग, बीएसएमआर ८५३ (पांढरी) वाणाच्या ८० बॅग, बीएसएमआर ७३६ (लाल) वाणाच्या १०० बॅग, बीडीएन-१३-४१ गोदावरी (पांढरी) वाणाच्या ८०० बॅग बियाणे उपलब्ध आहे. ज्वारी (परभणी शक्ती) वाणाच्या एकूण ५०० बॅग तर मूग (बीएम-२००३-२) वाणाच्या ३३० बॅग बियाणे उपलब्ध आहे. कपाशीच्या ‘एन एच १९०१ बीटी आणि एनएच १९०२ बीटी’ या वाणाचे प्रत्येकी १०० बॅग तर ‘पीए ८१०’ या वाणाच्या बियाण्याच्या २० बॅग उपलब्ध आहेत. भरडधान्यामध्ये राळा (पिडकेव्हि यशश्री), नाचणी (फुले कसारी) या अन्नधान्यांचे एक किलो वजनाच्या पिशव्यामध्ये बियाणे उपलब्ध असून प्रतिकिलो १०० रुपये दर आहेत. सद्यःस्थितीत विक्रीसाठी विविध पिकांचे मिळून ५६७ क्विंटल पान २ वर

# कराडची बी गँग ॲक्टिव्ह!

## आ.सुरेश धस यांनी जखमी दिवटे याची भेट घेतल्यानंतर केले गंभीर आरोप

**परळी । प्रतिनिधी**

**वाल्मीक कराड जेलमध्ये असला तरी त्यांची बी गँग परळी आणि बीड जिल्ह्यात अजूनही ॲक्टिव्ह आहेच. महाकालचे भस्म आणि कपाळावर गंध लावणारे हे त्यांचेच पोरं आहेत. शिवराज दिवटेला मारहाण करत संतोष देशमुख पार्ट टू करण्याचाच त्याचा प्रयत्न होता, तसे त्यांनी बोलूनही दाखवले आहे. पण दिवटे थोडक्यात वाचला, असे म्हणत सुरेश धस यांनी पुन्हा एकदा परळीतील गँगवार आणि त्यांच्या आकांचा उल्लेख करत या प्रकरणातील आरोपी आणि वाल्मीक कराड गँगचे संबंध असल्याचे सूचित करून गंभीर आरोप केले आहेत.**

परळीत शुक्रवारी शिवराज दिवटे नावाच्या तरुणाला दहा ते बारा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. अपहरण करून एका टेकडीवर नेत त्याला पट्टा, लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण करण्यात आली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख पान २ वर



### समाधान मुंडेच्या गँगला मोक्का लावा – नागरिकांचा ठिय्या

उर्वरित आरोपींना अटक करा, याशिवाय समाधान मुंडे याच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करा या मागणीसाठी लिंबोटा गावचे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. ग्रामस्थांनी रविवारी सकाळी बीड – परळी मार्गावर ठिय्या घातला. जोपर्यंत सर्व आरोपी अटक होणार नाहीत तोपर्यंत ठिय्या मागे न घेण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला होता.

### परळीत ३ दशकांची सत्ता, म्हणूनच माज – खा.सोनवणे



बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी रविवारी शिवराज दिवटे याची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. त्यानंतर त्याच्या वडीलांशीही त्यांनी चर्चा केली. परळीत १९९२ पासून एकहाती सत्ता असल्याने या सत्तेचाच हा माज असल्याची संतप्त प्रतिक्रिया खा.सोनवणे यांनी यावेळी दिली. या अपहरण आणि हल्ला प्रकरणातील फरार आरोपींना तातडीने अटक करा, अशी मागणी करतानाच पोलिस अधीक्षक दर्जाचा एक विशेष अधिकारी आणि कर्मचारी या प्रकरणाच्या चौकशीसाठी द्या, यासाठी आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचे सोनवणे यांनी माध्यमांना सांगितले.

### मराठा संघटनांकडून आज बीड, परळी बंदची हाक

बीड या प्रकरणामध्ये मराठा संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी सोमवार दि. १९ मे रोजी परळी आणि बीड बंदची हाक दिली आहे. या घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ असून बीड जिल्ह्यात वातावरण तापले आहे. शिवराज दिवटे मारहाण प्रकरणी उद्या (१९ मे) बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. ही बंदची हाक शांततेत होणार असून बीडच्या नागरिकांनी एकत्र येऊन हा बंद पुकारण्याचा ठरवले आहे, असे मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी म्हटले आहे. सोशल मीडियावर बंदच्या पोस्टही व्हायरल होत आहेत.

### अंबाजोगाईच्या डॉक्टरांवर मकोका लावा...

सुरेश धस यांनी यावेळी अंबाजोगाई रुग्णालयातील डॉक्टरांचे गुन्हेगारांना अभय असल्याचा आरोप देखील केला. अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातील काही डॉक्टर एकाच ठिकाणी पंधरा वर्षांपासून आहेत. हेच डॉक्टर पाय मोडला तरी खरचटले म्हणून अहवाल देतात, असे सुरेश धस म्हणाले. त्यामुळे हे डॉक्टर मकोकामध्ये आरोपी झाले पाहिजे, याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे. महादेव मुंडे यांच्या प्रकरणात देखील हेच लोक आहेत, असेही आरोप सुरेश धस यांनी केले.

## अन शरद पवार यांचा थेट अजित पवारांना फोन



**बारामती । प्रतिनिधी**

**पुण्यात शरद पवार यांना भेटण्यासाठी पुरंदर येथील शेतकरी त्यांच्या बंगल्यावर दाखल झाले होते. शेतकऱ्यांनी त्यांची अडचण सांगितल्यानंतर शरद पवारांनी थेट पुण्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवारांना फोन करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा केली. मात्र शरद पवार यांनी थेट अजित पवारांना फोन केल्याने याबाबत जोरदार चर्चा होत आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर बराच काळ अबोला राहिलेल्या शरद पवार आणि अजित पवार यांच्यात सातत्याने गाठीभेटी होत असून काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात हे दोन्ही नेते चर्चा करतानाचाही व्हिडिओ समोर आला होता. आता, शरद पवारांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांना फोन केल्याची माहिती समोर आली आहे. पुणे जिल्ह्यात नव्या उभारण्यात येत असलेल्या पुरंदर विमानतळाच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भाने शरद पवारांनी अजित पवारांना फोन करुन चर्चा केली. पुरंदर विमानतळ पान २ वर

## धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

### दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी – धनंजय मुंडे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.**

शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, पान २ वर

### सोलापूरात टॉवेल कारखान्यात भीषण आग; ८ ठार

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापुरातील अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीमधील सेंट्रल टेक्सटाईल मिल टॉवेल कारखान्याला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत मालक आणि कामगार कुटुंबातील एकूण ८ जणांचा मृत्यू झाला आहे. पान २ वर

## अजितदादा पवार यांच्या सभेला बहुसंख्येने उपस्थित रहावे -आ. विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीनंतर गेवराई शहरात १८ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला, अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला हक्काच्या पीटीआर चा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघाला. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले. त्यांच्या शुभहस्ते विकास कामांसह अतिक्रमण धारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे रोजी सायं. ५.३० वा. गेवराई शहरात होणार आहे. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. गेवराई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा केली.**

### विकास कामांसह अतिक्रमणधारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ होणार



गेवराई शहरातील १८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांसह अतिक्रमणधारकांच्या हक्काच्या पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे सायंकाळी ५.३० वा. र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई च्या प्रांगणावर होणार आहे. या प्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजीमंत्री आ. धनंजय मुंडे, जयभवानी सह. सा. कारखान्याचे पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३९.५० क्विंटल | २,५०३ | ३,०२५ | २,७२९ |
| ज्वारी/हायब्रिड: ३८.५० क्विंटल | १,७०० | २,९६१ | २,३०६ |
| मका/लोकल:१.०० क्विंटल | २,१९० | २,१९० | २,१९० |
| तूर : ३८.०० क्विंटल | ६,५०० | ६,७०० | ६,६०७ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६३.५० क्विंटल | २,०८२ | २,४७५ | २,३८० |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ४०.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,४०० | ५,४१० | ५,४०५ |

## ‘ई-पीक ॲप’मध्ये बिघाड; राज्यातील अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित

**मुंबई । प्रतिनिधी**

**शासनाने कृषी विभागाच्या विविध योजनांचा व नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी ई-पीक पाहणी करणे अनिवार्य केले आहे. पण गेल्या पंधरा दिवसांपासून ई-पीक ॲपमध्ये बिघाड आल्याने त्यात नोंदणी होत नसल्याने राज्यातील रब्बी धान उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत.**

रब्बी हंगामातील धान, मका व इतर पिकांची कापणी व पान २ वर




# पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारत देशाशी लढण्याचे स्वप्न बघू नये-आ.सुरेश धस





## प्रचंड शौर्य तिरंगा यात्रेने आष्टीकरांचे वेधले लक्ष

**आष्टी । प्रतिनिधी**

पाकिस्तान आतंकी स्थान झाला आहे.. पाकिस्तानचे सैन्यदल हतबल झाले आहे मोठ्या मोठ्या वल्गना करणारे..“ अगर पाणी बंद कर देंगे तो खून की नदिया बहेंगी ” म्हणणारे पाकिस्तान मंत्रिमंडळ बंकर मध्ये लपून बसले.. संपूर्ण जगासमोर पाकिस्तानची नाचक्की झाली आहे.. पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारताशी लढण्याचा विचार ही करू नये.. “ अब नरेंद्र मोदी का नया भारत है.. देश मोदी जी के साथ है, और देश सेना के साथ है असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

आष्टी येथे त्यांनी आयोजित केलेल्या..शौर्य तिरंगा यात्रेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर श्रीमती भाकरे श्रीमती काकडे श्रीमती कमल सोंडगे श्रीमती रत्नमाला वाल्हेकर श्रीमती अरुणा नागरगोजे श्रीमती भाग्यश्री राख श्रीमती सीताबाई राख श्रीमती सीताबाई गायकवाड श्रीमती तावरे या केवळ वीर पत्नी वीरमाता यांची उपस्थिती होती प्रमुख उपस्थितांमध्ये सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे उत्तम बोडखे, शरद रेडेकर, सुनील रेडेकर, बद्रीनाथ जगताप,सुरेश उगलमुगले,भागवत येवले, यशवंत खंडागळे दीपक निकाळजे राजू जाधव, संजय गाढवे,आदि उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीस त्रिजल माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी श्री.अंकुशखोटे यांनी स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची. ‘ ये भारत कोई भूमिका टुकडा नही, ये वंदन की धरती है अभिनंदन की भूमी है.. ही कविता ऐकवली..सेवानिवृत्त मेजर श्री.भोसले यांनी प्रास्ताविक केले.. या संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रेचे सूत्रसंचालन सूत्र बाळासाहेब पान २ वर

cmyk

अग्रलेख

# दहशतवाद पोसण्यासाठीच हातभार !

भारत आणि पाकिस्तान संघर्ष शिगेला पोहोचला असतानाच पाकिस्तानला नवा मित्र मिळाला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफ हे त्याचे नाव. गेल्या आठवड्यातच आयएमएफने पाकिस्तानला १ अब्ज डॉलरचे कर्ज दिले होते. आता पुन्हा पाकला १.०२ अब्ज डॉलर म्हणजे ८४०० कोटी रुपयांचा दुसरा हप्ता देण्यात आल्याची बातमी आहे. पाकिस्तानला दिल्या जाणार्या कर्जाच्या संदर्भात आयएमएफची बैठक झाली होती. त्यात भारताने हे कर्ज देण्यास विरोध केला होता. त्याचे कारण जगाला माहिती आहे. तरीही मदतीसाठी आसुसलेल्या हातांनी नापाक इरादे असणाऱ्या पाकला मदत करण्याचा निर्णय घेतला. हा पाकिस्तानातील जनतेप्रती असलेला कळवळा आहे की निर्णय घेण्याच्या प्रणालीवर कोणत्या शक्तींचा दबाव आहे हे तपासण्याची गरज आहे. जे काही समोर दिसते आहे त्यावरून एक गोष्ट निश्चित आहे की, कोणाच्या तरी आग्रहास्तव हा निर्णय घेतला गेला आहे. निर्णय घेणाऱ्यांना पाकिस्तानची दहशतवाद पोसण्याची पॉलिसी मान्य आहे असे त्यातून स्वच्छ दिसते आहे. तसे जर असेल तर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर विनाकारण मुठी आवळून जगाची पोलीसगिरी आता सगळ्यांनी बंद करणेच योग्य ठरेल.

भारतात पहलगाम येथे अत्यंत विकृत हल्ला झाला. पर्यटकांना मारणारे दहशतवादी पाकिस्तानच्या दिशेनेच पळाले. त्यांचा शोध लागला किंवा कसे हे अद्याप समोर यायचे आहे. भारताने यामुळे आपले निषेधाचे खलिते पाठवण्याचे धोरण बदलत कारवाई केली. ती पाकिस्तानच्या आत जाऊन केली. दोन्ही देशांमध्ये थेट संघर्ष सुरू झाला. पाकिस्तान जगभरात भिक्षापात्र घेऊन फिरत असतानाच आणि त्यांना भिक्षेची आत्यंतिक गरज असतानाच त्यांना आयएमएफकडून कर्ज मिळाले. संयुक्त राष्ट्रांप्रमाणेच येथेही कोणता निर्णय घेताना मतदान होते. मात्र 'नाही' म्हणायचा अधिकार नाही. तुम्हाला एकतर बाजूने मत द्यावे लागते अथवा मतदानापासून स्वत:ला बाजूला ठेवावे लागते. भारत अर्थातच मतदानापासून दूर राहिला. प्रत्येक पावलावर जगाची मिन्नतवारी करण्यात आणि त्यांना वाईट गोष्ट कशी वाईट आहे हे सांगण्यातच आपली शक्ती खर्ची घालण्यात काही साध्य होत नसते. पाकिस्तान या पैशाचा उपयोग सीमेपलीकडून होणार्या दहशतवादाचे पोषण करण्यासाठीच करणार असल्याचे जगाला कळत नसावे इतके जग निर्बुद्ध नाही. तरीही गोष्टी घडत आहेत याचा अर्थ प्रत्येकाचे आपले भूराजकीय गणित वेगळे आहे आणि त्यानुरूपच ते चालत असतात. गेल्या तीन दशकांपासून किंवा त्या अगोदरही पाकिस्तानने आयएमएफ आणि अन्य जागतिक संस्थांकडून अब्जावधी डॉलरचे कर्ज घेतले आहे. तरीही पाकिस्तानचा ना चेहरा बदलला आहे ना चरित्र.

मिळणारी एवढी मोठी रक्कम नेमकी जाते कुठे याचाही थांगपत्ता त्या देशातील जाणकारांना लागत नाही. कारण, कोणतीही पारदर्शकता नाही. भारताविरुद्धच्या दहशतवादासाठी यातील काही भाग वळवला जातो हेही आता लपून राहिले नाही. भारतासोबत संघर्ष सुरू होण्याच्या अगोदरच पाकिस्तान मोठ्या आर्थिक संकटात होता. परकीय चलनसाठ्यात सातत्याने घट होतेच आहे, महागाईही प्रचंड वाढली आहे. मिळणार्या निधीमुळे पाकच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल असा दावा केला जात असला तर तो खोटा आहे. कारण, त्यांनी याच सुमारास भारताची कुरापत काढून पायावर कुऱ्हाड मारून घेतली. विविध संस्थांच्या अहवालांतील आकडेवारी सांगते की सप्टेंबर २०२४ मध्येच पाकिस्तानवर १३१.१ अब्ज डॉलर विदेशी कर्ज होते. हा आकडा कोणत्याही देशावर असलेल्या परकीय कर्जाचा उच्चांक आहे. यातून निर्माण झालेल्या संकटावर मात करण्यासाठी पाकिस्तानने अन्यत्र उधारी केली आहे. केवळ तीन महिन्यांच्या आयातीचा खर्च भागवू शकेल एवढाच परकीय चलनसाठा आज पाकिस्तानकडे आहे. कृषी क्षेत्रापासून सगळ्याच बाजूने त्यांची अर्थव्यवस्था कोलमडली आहे. विकासाचे किरण दूर दूरपर्यंत दृष्टीपथात नाही आणि अर्थव्यवस्था पूर्णत: ठप्प झाली आहे. अशा दयनीय स्थितीत भारतासोबत त्यांनी अकारण संघर्ष केला. त्याहीपेक्षा विचित्र म्हणजे आयएमएफ पाकला मदत करण्यासाठी पुढे सरसावली. आपण हा पैसा देतो आहे किंवा यापूर्वी जो पैसा दिला तो नेमका कुठे खर्च झाला हे आयएमएफला जाणून घ्यावेसे वाटले नाही? पाकच्या संदर्भात जे काही चित्र जगासमोर वेळोवेळी येत असते त्यावरून एक बाब अधोरेखित होते की या देशाला ना आपल्या देशातील लोकांच्या गरिबीची चिंता आहे, ना त्यांच्या आरोग्याची आणि ना मुलांच्या शिक्षणाची. तसे जर नसते तर पाकिस्तानात गेल्या पाच-सात दशकांत मोठा बदल झालेला दिसला असता. कोणत्याही राजकीय पक्षाने देशाची दशा आणि दिशा बदलण्याचा प्रयत्न केला नाही. कारण तसे करणे लष्कराच्या विरोधात जाण्यासारखे. लोक शहाणे झाले की ते प्रश्न विचारतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. तसे होऊ नये यासाठीच शिक्षणाच्या नावाने कथित धार्मिक संस्थांमधून केवळ भारतद्वेष शिकवला गेला आणि फुत्कार सोडणाऱ्या पिढ्या निर्माण केल्या गेल्या. पहलगाम नंतर भारताने केलेल्या कारवाईत केवळ भारतद्वेषी मारले गेले नाहीत, तर अन्य देशांतील निष्पाप नागरिकांच्या रक्ताने ज्यांचे हात माखले आहेत तेही मारले गेले. त्याचे कारण दहशतवाद्यांचा आश्रयदाता आणि पोषणकर्ता पाकिस्तानच आहे. आयएमएफ अथवा अन्य संस्थांना याचे भान नसावे हे खरे वाटत नाही. मग त्यांनी हा दहशतवाद पोसण्यासाठीच पाकिस्तानला रतीब घालणे सुरू ठेवले आहे का? असा प्रश्न आपोआपच उपस्थित होतो.

# राज्यव्यापी कर्जमुक्ती आंदोलनाची मशाल पेटली

## कर्जमुक्ती द्या अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही-रविकांत तुपकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे खोटे आश्वासन देणाऱ्या राज्यातील महायुती सरकारविरोधात क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार असुन या अनुषंगाने राज्यात विविध जिल्ह्यात कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवारी दि.१७ मे रोजी रात्री ८ वाजता अंबाजोगाई तालुक्यातील देवळा येथे आयोजित कर्जमुक्ती एल्गार मेळाव्यात क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारविरोधात शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळविण्यासाठी मशाल पेटवून राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले . सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दुर्लक्ष केले तर जून महिन्यामध्ये राज्यभरात आक्रमक आंदोलन छेडले जाईल राज्यातील कुठल्याही मंत्र्याला रस्त्यावर फिरू दिले जाणार नाही मंत्राच्या बुडाखाली आग लागल्याशिवाय शेतकरी स्वस्थ बसणार नाही शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सरकारने वेळीच दखल घ्यावी अन्यथा मुंबईतील मंत्रालयात मंत्र्यांना दालनाताच घेराव घालू





कुठल्याही परिस्थितीत राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत आंदोलन चालूच ठेवणार असल्याच्या निर्धार रविकांत तुपकरांनी व्यक्त केला. कर्जमुक्ती मेळाव्याच्या संयुक्त अध्यक्षस्थानी ह.भ.प. लालासाहेब नाना पवार व देवळ्याचे सरपंच रावसाहेब नाना यादव होते. कर्जमुक्ती मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट , बीड जि. प.माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, राष्ट्रीय काँग्रेस चे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे ,क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,जेष्ट शेतकरी नेते अच्युत गंगणे , राज्य कोअर कमिटीचे सदस्य सत्तार पटेल ,लातूर जिल्हाध्यक्ष अरुण कुलकर्णी , मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव ,संभाजी ब्रिगेडचे बीड पूर्व जिल्हाध्यक्ष प्रवीण ठोंबरे,शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनुरथ काशीद ,नवनाथ शिंदे,रामराम बाबा लोमटे, विष्णु काका शिंदे , आदी मान्यवर उपस्थित होते.या मेळाव्याचे प्रास्ताविक निमंत्रक क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले .तर अरुण आबा पवार ,भास्कर आगळे ,नारायण मुळे ,ऍड. राजेश शिंदे यांनी परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या असून शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकऱ्यांचे मरण दारात आहे अशा परिस्थितीमध्ये पक्षीय अभिनिवेश न बाळगता आम्ही शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहू व शेतकरीची चळवळीची वज्रमूठ अवळू असे आश्वासन बीड जि.प.चे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख यांनी दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी संघटनेने दिलेल्या एक कलमी कार्यक्रमाची कृती करण्याची गरज असून देवळा परिसरात यापूर्वी झालेल्या ऐतिहासिक ऊसाच्या झोनबंदी आंदोलनाच्या आठवणी जाग्या करून आगामी कर्जमुक्ती आंदोलनात मांजरा बेल्ट मधील शेतकरी मागे राहणार नाहीत याची दक्षता घेण्याचे शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी आवाहन केले. गावगाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या तरुण पोरांनी आगामी कर्जमुक्तीच्या आंदोलनात उतरून आपल्या मायबाप शेतकऱ्यांना आत्मसन्मान मिळविण्यासाठी हीच एकत्र येण्याची योग्य वेळ आहे.आपण सर्वच युवा शेतकऱ्यांनी हे आंदोलन ताकदीने पुढे नेण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी प्रास्ताविकात केले.

# अंबड येथे जागतिक संग्रहालय दिन साजरा

अंबड । प्रतिनिधी

शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शोध संस्थानच्या संग्रहालयाच्या वतीने दि.१८ रोजी जागतिक संग्रहालय दिन साजरा करण्यात आला. या संग्रहालयात होळकरकालीन, शिवकालीन चांदीची, तांब्याची नाणी, शाही घड्याळ,शौर्य पदके, शंभर वर्षे जुना कंबरपट्टा, पितळी आकडा, छड्या, तितरी, हासली नामक बंजारा समाजाचे आभुषण, मंदिर, घाट, बारवा, शिलालेख पेंटीग व चित्र,दुर्मिळ पुस्तके,कागदपत्रे,टपाल तिकीट,कव्हर आदी वस्तू असुन त्याचे प्रदर्शन लावण्यात आले होते.संग्रहालयाचे प्रमुख रामभाऊ लांडे यांनी इतिहास संशोधनाच्या माध्यमातून अंबड शहरात ऐतिहासिक संग्रहालय सुरू केल्याने भेट देण्यासाठी पर्यटक व अभ्यासक येतात.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी चांदीची विशेष नाणी तयार करुन घेतली होती ज्या नाण्यांवर शिवलिंग, बेलपत्र,खांडा,कट्यार आहे ते विशेष नाणे संग्रहालयात पहायला मिळते.देशभर केलेल्या धार्मिक कार्यासाठी या नाण्यांचा वापर होत असे.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेकानिमित तयार करण्यात आलेले सुवर्ण होन प्रतिकृती तसेच स्वराज्य चलन असलेले शिवराई नाणी पहायला मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे एक हजार छायाचित्रे,एक हजार नाणी संग्रहालयात असल्याचे श्री. रामभाऊ लांडे यांनी सांगितले असुन नागरिकांनी या संग्रहालयासाठी आपल्या कडे असलेले कागदपत्रे,वस्तू भेट देण्याचे आवाहन केले असुन येणाऱ्या काळात अंबड शहरात चांगले संग्रहालय सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे.

# देश प्रेमाची नाळ जपणारी तिरंगा पदयात्रा

जालना । प्रतिनिधी

जालन्यात तिरंगा पदयात्रा आम्ही जालनेकर भारतीय सैन्यासोबत देश प्रेमाची नाळ जपणारी भव्य तिरंगा पदयात्रा जालन्यात करण्यात आली या तिरंग्याचा अभिमानासाठी एकत्र येऊन देशाचा अभिमान करण्यात आला जालना येथे तिरंगा रॅलीमध्ये उपस्थित, मा. मंत्री बबनरावजी लोणीकर मा. आमदार तथा जिल्हा



अध्यक्ष नारायण कुचे, सुनील बापू आर्दड महाराष्ट्र प्रदेश निमंत्रित सदस्य, अंकुशराव बोबडे भाजप किसान मोर्चा महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य,सर्जेराव जाधव, कैलासराव शेळके, शंकर मामा लामगे,भास्करराव पांढरे अर्जुनराव माळोदे, सुरेश पोटे, सदाशिव यादव, गोवर्धन कंक, बंडू आराध्य, अमोल काळे, श्रीमंत दौंड, गणेश मेंगडे, अंकुश सुलताने, आदी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### 'वनामकृवि'च्या बियाणे

बियाणे उपलब्ध आहे. त्यानंतर बीज प्रक्रियेनंतर बियाणे उपलब्ध होईल, असे सूत्रांनी सांगितले.

-------------

### अन शरद पवार यांचा

आणि येथील शेतकऱ्यांचा विरोध याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला. पुण्याचे जिल्हाधिकारी याबाबतीत लक्ष घालत असल्याची माहिती अजित पवार यांनी शरद पवारांना दिली. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपलाच असल्याचे सांगत शरद पवारांपासून वेगळे होऊन महायुतीसोबत जाणे पसंत केले. महायुतीसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठे यश मिळाले. तर, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा मोठा पराभव झाला. शरद पवारांचे केवळ १० आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात चर्चा केली जात आहे. मात्र, अजित पवारांनी या चर्चेला कुठलाही आधार नसल्याचे म्हटले. तर, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा निर्णय सुप्रिया सुळे घेतील, असं शरद पवारांनी म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यातच, गेल्या काही दिवसांत शरद पवार आणि अजित पवार हे कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येताना पाहायला मिळत आहेत. आता, पुणे दौऱ्यावर असताना शरद पवारांनी थेट फोन करुन अजित पवारांना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा केली आहे.

-------------

### कराडची बी गँग

यांच्या निर्घृण खूनाची दहशत अद्याप कायम आहे. त्यात पुन्हा एका तरुणाचे अपहरण करून त्याला मारहाण आणि तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी दिलेली धमकी यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. आमदार सुरेश धस यांनी हे त्यांचेच लोक आहेत असे म्हणत वाल्मीक कराड गँगकडे बोट दाखवले आहे. शिवराज दिवटे याला अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न शुक्रवारी झाला. या मारहाणीचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. शिवाय दिवटे याने आरोपींनी मारहाण करतांना तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी धमकी दिल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर रविवारी बीड-परळी रोडवरील गोपीनाथ गड रस्त्यावर लिंबोटा ग्रामस्थांनी आरोपींवर मकोका लावण्याची मागणी करत रास्तारोको केला. दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर भाष्य करताना आरोपींचे वाल्मीक कराड व इतर नेत्यांसोबत फोटो आल्याचा दावा केला. हे त्यांचेच लोक आहेत, वाल्मीक कराडी बी गँग जिल्ह्यात ॲक्टिव्ह आहे. शिवराज दिवटे याचा संतोष देशमुख होता होता राहिला, असे सांगत या महाकाल टोळीचा बंदोबस्त करावा लागेल, असेही धस म्हणाले.

------------

### धनंजय मुंडेंनी घेतली

सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

--------------

### सोलापूरात टॉवेल कारखान्यात भीषण

रविवारी पहाटे साडेतीन वाजता आग लागल्यानंतर याची माहिती सुरक्षारक्षकाला समजल्यानंतर त्याने बाजूच्या कारखान्यातील सुरक्षा रक्षकाला सांगून अग्निशामक दलाला कळविले. तातडीने अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळ आल्या. कारखान्याच्या आतील भागात जाण्यासाठी अरुंद रस्ता असल्यामुळे मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. तोपर्यंत आग मोठ्या प्रमाणावर भडकली होती. कारखान्याचे मालक उस्मान मन्सूरी तसेच एक कामगार कुटुंबीय असे एकूण ८ जण या कारखान्यात काम करून तेथेच राहत होते. मेहताब बागवान, त्यांची मुलगी हिना वसीम शेख आणि मुलगा सलमान मेहताब बागवान या तीन कामगार कुटुंबातील सदस्यांचे मृतदेह सकाळी बाहेर काढण्यात आले.

----------

### अजितदादा पवार यांच्या सभेला बहुसंख्येने

चेअरमन अमरसिंह पंडित, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनिल मगरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या बाबत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेला आ. विजयसिंह पंडित यांच्या सह महेश दाभाडे, बीडचे माजी नगरसेवक निजाम शेख, सचिन मोटे, कृष्णा मुळे , मंजुर बागवान, विलास सुतार, राधेशाम येवले, किशोर कांडेकर यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. यावेळी बोलतांना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याचे काम प्रमाणिकपणे सुरु आहे. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहरातील अनेक विकासाची प्रलंबित कामे पुर्ण होत असल्याचा आनंद आहे. शहरातील गोर-गरीबांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याचे काम आम्ही केले, या पुर्वीच्या सत्ताधार्यांनी स्वता:ची अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी सत्तेचा वापर केला. अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली. माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे व त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा पत्रकार परिषदेत आ. पंडित यांनी केली.

**चांगले काम करणार्या शिवछत्र परिवारा सोबत राहणार – महेश दाभाडे**

शिवछत्र परिवाराने कधीही सुडाचे राजकारण केले नाही, ज्यांच्या विरोधात मी लढलो त्यांनी मला जवळ केले हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. भैय्यासाहेब आणि विजयसिंह पंडित ग्राऊंड लेवलला राहुन काम करतात, त्यांना सामान्यांच्या प्रश्नांची जाण आहे. माझ्या सोबतच्या कार्यकर्त्याला राजकारणात सन्मानाचीवागणुक मिळावी यासाठी शिवछत्र परिवारासोबत भविष्यात काम करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी यावेळी सांगितले.

-------------

### 'ई-पीक ॲप'मध्ये बिघाड; राज्यातील

मळणी काहीच दिवसांत सुरू होणार आहे. त्यानंतर बरेच शेतकरी हे हमीभावाने शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करतात. पण शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे. ई-पीक पाहणी ॲपमध्ये नोंदणी करून त्यात पीक पेऱ्याची नोंद करून शेतात लावलेल्या पिकाचा लाईव्ह फोटो अपलोड करावा लागतो. रब्बी हंगामात लाखो हेक्टरवर धान तर उर्वरित क्षेत्रावर इतर पिकांची लागवड करण्यात आली आहे. ई-पाहणी ॲपमध्ये वारंवार खोडा निर्माण होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. काही जिल्हयांत रब्बी हंगामात शासकीय धान खरेदी केंद्रावर हमीभावाने धानाची विक्री करण्यासाठी अत्यल्प शेतकऱ्यांनी आतापर्यंत नोंदणी केली असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, ई-पीक पाहणीची अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू असून प्रत्येक वेळी पीक विम्यात पीक पाहत आहोत की, विमा एका पिकाच्या आणि प्रत्यक्ष दुसरं पीक आहे. त्यामुळे अडचणी निर्माण होता. बीड सारखी एक घटना लक्षात आली. सरकारी जमिनीवर पीक विमा काढला. त्यामुळे ई-पीक पाहणी अनिवार्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटले आहे.

**नुकसान भरपाईपासून वंचित**

ई-पीक पाहणीमध्ये नोंद झाल्यानंतरच शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करून धानाची हमीभावाने विक्री करता येते. पण गेल्या पंधरा दिवसांपासून हे ॲप चालत नसल्याने राज्यातील लाखो शेतकरी नोंदणीपासून वंचित आहेत. या शेतकऱ्यांची वेळेत नोंदणी पूर्ण न झाल्यास त्यांना हमीभाव व नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास नुकसानभरपाई मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे.

-------------

### पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारत

तळेकर यांनी केले. पुढे बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, २२ एप्रिल रोजी काश्मीर मधील पहलगाम परिसरातील बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटनाला गेलेल्या भारतीय नागरिकांना विशेषतः पुरुषांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालून मारण्यात आले. कुटुंबीयां देखत, पत्नी समोर ,मुलाबाळांवर समोर..विशेषतः केवळ पुरुषांना क्रूर पद्धतीने गोळ्या घालून मारण्यात आले ही अत्यंत अमानवी कृती होती त्यामुळे या पाकिस्तान पुरस्कृत आतंकवाद्यांना आणि पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी अत्यंत विचारपूर्वक योजना आखून पाकिस्तानला धडा शिकवला आहे दि.६ मे च्या रात्री अगोदर पहिल्या दिवशी शंभर ते दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालून दुसऱ्या दिवशी दि.७ मे रोजी केवळ २३ मिनिटांमध्ये पाकिस्तानातील प्रमुख नऊ हवाई तळ उध्वस्त करून भारतीय सैन्याने पराक्रमाची गाथा लिहिली आहे..अफगाणिस्तान,अरब अमिराती, या मुस्लिम राष्ट्रांनी आणि दोन तीन देश वगळता.संपूर्ण जगाने भारताला पाठिंबा दिला आहे.. पाकिस्तानला केवळ तुर्की आणि अझरबैझान या भिकारी राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे. भारतावर यापूर्वी दहशतवादी हल्ले झाले ..२६/११ हा भारत देशावरील हल्ला होता, मुंबई शहरात बॉम्ब स्फोट झाले शेकडो नागरिक मारले गेले.. परंतु तात्कालीन भारतीय पंतप्रधानांकडून केवळ निषेध व्यक्त झाला.. पाकिस्तानला चोख उत्तर देण्यात आले नव्हते. परंतु आता भारत बदललेला आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाला सूट दिलेली आहे मोकळीक दिलेली आहे काही दिवसांपूर्वी याच तुर्कस्तानमध्ये भूकंप झाला असता त्यावेळी त्यांना वैद्यकीय मदत देणारा पंतप्रधान मोदींचा भारत देश हाच सर्वात पुढे होता मात्र तुर्की देशाने या मदतीची उपकाराची परतफेड अपकाराने केली असून पाकिस्तानला मदत केली आहे पाकिस्तान कडे शस्त्र नाहीत शस्त्र घ्यायला पैसे नाहीत प्रचंड कर्जबाजारी असल्यामुळे आज पाकिस्तानात महागाईने कहर केला असून जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत पाकिस्तानचे सैन्यदल देखील सैन्यदल राहिले नसून ते अतिरेकी झाले आहेत सैन्यदल आणि अतिरेकी यांच्यात काहीही बदल राहिलेला नाही ...असे सांगत भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही शौर्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे आणि यामध्ये मतदारसंघातील हुतात्मा झालेल्या वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले त्रिदल माजी सैनिक संघटना, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी विद्यार्थिनी ,यांचे त्यांनी मनापासून आभार मानले आष्टीच्या पंचायत समिती येथील हुतात्मा स्मारकापासून हुतात्मा जवानांच्या वीर पत्नी वीर माता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत मातीची प्रतिमा असलेला अश्वारूढ रथ लक्ष आकर्षण घेत होता बँड पथकाच्या निनादात देशभक्तीच्या ‘‘ नया भारत का जलवा देखा, पाकिस्तान ने मलबा देखा,‘‘ ‘‘ हिंद की सेना ने भरी हुंकार.. पाकिस्तान मे मचा हाहा:कार..‘‘ ‘‘ घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है, जो हिंदुस्तान से टकरायेगा,चूर चूर हो जायेगा... घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है.. जो हिंदुस्थानको टकरायेगा.. चुरचुर हो जाएगा, सिंदूर का हिसाब चुकाया है, पाकिस्तान को सबक सिखाया है, अशा राष्ट्रभक्तीपर देशप्रेमाने भारलेल्या घोषणांनी आष्टी नगरी दुमदुमून गेली होती.. यावेळी हजारो नागरिक या शौर्य तिरंगा यात्रेत सामील झाले असल्याने संपूर्ण आष्टी शहरातील नागरिकांचे या तिरंगा यात्रेने लक्ष वेधले.. ही संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी करण्यासाठी आमदार सुरेश जोशी यांच्या कार्यकर्ता समूहाने यांनी खूप मोठे परिश्रम घेतल्याने ही शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी झाली

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १९ मे २०२५



## सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

गेल्या वीस-पंचवीस दिवसापासून भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थिती संपूर्ण देशात निर्माण झाल्यामुळे सदर परिस्थितीची पूर्वतयारी आणि खबरदारी म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक च्या सूचनेनुसार दि.१७ मे २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे सांगितल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार, डॉ.विवेक दुसाने, डॉ.अशोक शिंदे, डॉ.अंजली ढोले, डॉ.वृषाली कुलकर्णी, डॉ.सारिका ससाने, डॉ.मीना हांगे तसेच विद्यार्थी प्रतिनिधी भूषण अवसरमले, राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी ओम आगरकर, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी रमेश थोरात, ओम आगरकर, प्रद्युम्न डहाळे यांनी परिश्रम घेतले.

# भाशिप्र संस्थेने मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकता जपली

## नविन शैक्षणिक धोरण राष्ट्र हिताचे, अंत:करणात ज्ञानाची आवड महत्वाची - ह.भ.प. श्री चैतन्य महाराज देगलुरकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने ७५ वर्षापासुन काम करताना मुळ उद्दिष्टांपासून दुर न जाता प्रामाणिकता जपत समाज मनाचा विश्वास संपादन केला. संस्थेकडे व्यापक दृष्टी असुन राष्ट्रहित तथा उत्तम भारतीय नागरिक घडवणारे संस्कार दिले जात असल्याने नावलौकिक उच्च स्तरावर जावुन पोहोचला. ज्ञान हे माणसाच्या अंत:करणात असेल तर सर्वांगिण व्यक्तिमत्वाचा विकास झाल्याशिवाय रहात नाही. नविन शैक्षणिक धोरण हे जनकल्याणाचे असुन जुनी कात टाकुन नविन बदल घडवण्याची क्षमता धोरणात असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.श्री चैतन्य महाराज देगलुरकर यांनी केले.**

येथील खोलेश्वर माध्यमिक शाळेच्या इमारत भुमीपुजन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर संस्था अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, स्थानिक अध्यक्ष विजयराव वालवडकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना स्थानिक मंडळ कार्यवाह किरण कोदरकरांनी संस्था ७५ वर्षात जाताना भौतिक सुविधा ही काळाची गरज लक्षात घेत सुसज्ज शाळेची इमारत शहरात असावी. सर्वांच्या सहकार्याने आम्ही बांधकामाचा निर्णय पुर्णत्वाकडे घेवुन जावु हा विश्वास बोलुन दाखविला. कार्यवाह डॉ.हेमंत वैद्यनी बोलताना सांगितले की, शिक्षण संस्था चालवताना भौतिक सुविधा काळाची गरज असुन वर्तमानकाळात ठिकठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर असल्याचे सांगुन खोलेश्वर शाळेची भव्य इमारत पुर्ण करून दाखवु हा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षपदावरून बोलताना डॉ.आलुरकरांनी संस्था आता परिवर्तनाच्या दिशेने जात असुन



गुणवत्तेत जशी आमची आघाडी, तशी भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देखील संस्था कार्यकारी मंडळ संकल्पित विचाराने पुढे जात असल्याचे सांगितले. आपल्या भाषणात चैतन्य महाराजांनी सुरूवातीलाच सांगितले की, ज्ञान मंदिर बांधकामाचा शुभारंभ माझ्या हस्ते होणं हा पुण्यकर्माचा भाग म्हणावा. नव्हे तर माझे भाग्य देखील. ज्ञान संपादन करताना अंत:करणात आवड असणे महत्वाचे. नसेल तर मृतपाय ज्ञानाची अवस्था होवुन जाते. बलवान, ज्ञानमय कोष होण्यासाठी भाशिप्र सारख्या संस्था समाजात काळाची गरज असल्याचे ते म्हणाले. परीक्षार्थी विद्यार्थी घडवणे त्यापेक्षा ज्ञान अंत:करणात गेले तर मुला-मुलींच्या व्यक्तिमत्वाचा विकास तर होतो तत्वत उद्याची पिढी सर्वांग सक्षम ज्यामुळे राष्ट्रहित देखील साध्य होते. सरकारने नविन शैक्षणिक धोरण हाती घेताना जीवनाला आवश्यक असणारे बदल या माध्यमातुन बीजाची पेरणी सुरू केली. ज्याचे परिणाम भविष्यात पहायला चांगले मिळतील. सनातन धर्माच्या संस्कृतीत बदल करताना काही गोष्टी जुन्या काढुन नव्याने आणत परिवर्तन घडवण्याचा संकल्प आणि उद्देश अतिशय चांगला असल्याचे त्यांनी सांगितले. माणसाचं जीवन वेगवेगळ्या ज्ञानाने समृद्ध असावं हाच हेतु नविन शैक्षणिक धोरणाचा असुन त्यानुसार ज्ञानाची प्राप्ती झाली तर प्रत्येक माणुस स्वावलंबी बनल्याशिवाय रहाणार नाही. शाळेची इमारत भव्य दिव्यतेने निर्विघ्न पुर्णत्वाकडे जाईल आशिर्वादही त्यांनी दिला.सुत्रसंचालन प्रा.दत्ताप्रसाद गोस्वामी यांनी तर आभार उन्मेष माथेकरांनी मानले. कार्यक्रमापुर्वी महाराजांच्यासह संस्था, पदाधिकारी, हितचिंतकाच्या उपस्थितीत प्रक्रिया पुर्ण झाली. यावेळी माजी प्राचार्य राजाभाऊ धाट, डॉ.शरदराव हेबाळकर, बिपीनदादा क्षीरसागर, चंद्रकांतराव मुळे, राम कुलकर्णी, उमेश जगताप, डॉ.अतुल देशपांडे, अविनाश तळणीकर, बाबुराव आडे, आप्पाराव यादव, सौ.वर्षाताई मुंडे, श्रीमती शरयु हेबाळकर, श्री महामुनी सर, प्रा.पाठक, डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रा.अविनाश जोशी, प्रा.राहुल कुलकर्णी, प्रसिद्ध आर्किटेक्ट दिनेश पुरी आदी मान्यवर उपस्थित होते. संकुलातील सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉक्टर होण्यासाठी मोठा त्याग करावा लागतो - डॉ. डाके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**डॉ. होण्यासाठी नियमीत आभ्यास व अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो असे प्रतिपादन माजलगांव तालुक्यातील मोठेवाडी येथील डॉ.रामेश्वर जंगले, डॉ.प्रतिक्षा जंगले या दामपत्यांचे विठाई हॉस्पीटल व गोपाळ खेत्री यांचे हरी- प्रल्हाद मेडीकल उद्धघाटन प्रसंगी हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकिसन डाके यांनी दि १८ मे रविवार रोजी केले.**

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे विठाई हॉस्पीटलचे उद्धघाटन माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी बोलताना डॉ. राधाकिसन डाके यांनी वैद्यकीय शिक्षण घेत असताना ऐन उमेदीची आणि तरुणपणाची



महत्त्वाची वर्ष शिक्षणात घालावी लागतात,वयाच्या महत्त्वाच्या वर्षामध्ये शिक्षण घेतल्यामुळे, तारुण्य काळातील आयुष्य फक्त ध्येयाच्या पाठीमागे धावत निघून जाते, तो काळ फारच कठीण असतो, परंतु त्या काळात घेतलेले शिक्षण भविष्यामध्ये रुग्णांची सेवा करण्यात अत्यंत उपयोगी पडते, आपण एखाद्या आजारी व्यक्तीचे दुःख निवारण करू शकतो हे समाधान या सेवेमधून मिळते,असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा.आर. एस. यादव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.यावेळी डॉ. किशोर भोपळे,डॉ. गणेश आगे,डॉ. दिनकर मस्के, डॉ. श्रेयश देशपांडे,डॉ. लक्ष्मीकांत यादव, डॉ.प्रताप लेंडाळ, डॉ.भानुदास रासवे, डॉ.प्रज्ञा खेत्री,डॉ महेश कटारे,डॉ. सारीका कटारे,प्रा. आर. एस. यादव, माजी सरपंच अविनाश गोंडे, विष्णु खेत्री,दत्ता चव्हाण,माजी जि.प.सदस्य शिवप्रसाद खेत्री, श्री ह.भ.प.शिवदास महाराज जंगले ,वसंतराव रणखांब,माऊली खेत्री.यांची प्रमुख उपस्थीती होती.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमेश्वर हिवरकर यांनी केले तर आभार सुरेश खेत्री यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप खेती, अंकुश खेत्री, भिमराव जंगले, लक्ष्मण खेत्री,. अशोक जंगले, दामोधर खेत्री यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शेतकऱ्यांनो, खते-बियाणे, कीटकनाशके खरेदी करताना काळजी घ्या-दत्ता वाकसे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खरीप हंगाम सुरु असून शेतकऱ्यांना योग्य व उत्तम गुणवत्तेचे बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके पुरविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी निविष्ठा खरेदी करतांना काळजी घेतली पाहिजे. फसवणूक झाल्यास कृषी विभाग कृषी अधिकाऱ्याकडे तक्रार करा, असे आवाहन मल्हार ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे. परवानाधारक बियाणे विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करावे. सीलबंद वेष्टनातील खूनचिठ्ठी (लेबल) असलेले बियाणे खरेदी करावे. सीलबंद नसलेले बियाणे दर्जाची खात्री नसल्याने ते खरेदी करु नये. खरेदी केलेल्या बियाणाबाबत संपूर्ण तपशील असलेले उदा. पीक वाण, लेबल नंबर, वजन दिनांक, वैध मुदत, बियाणे किंमत, खरीददाराचे, उत्पादकाचे, विक्रेत्याचे नाव तसेच विक्रेत्याची सही इत्यादी रोखी अथवा उधारीची पावती घ्यावी. बियाणे खरेदी करतांना त्यावरील वैध मुदतीची खात्री करुन वैध मुदतीच्या आतील बियाणे खरेदी करावे. छापील किंमतीपेक्षा जादा



दराने बियाणे खरेदी करु नये. अशी बाब निदर्शनास आल्यास वैद्यमापनशास्त्र विभागाचे निदर्शनास आणून द्यावे. विशिष्ट संशोधित वाणाचा आग्रह न धरता त्याच गुणधर्माचे अधिसूचित वाणाचे प्रमाणित बियाणे शक्यतो खरेदी करावे. बियाणे खरेदी केल्यानंतर खरेदीची पावती वेस्टन व त्यावरील लेबल व पिशवीतील थोडेसे बियाणे हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे. बियाणे दर्जा उगवण क्षमता भौतिक शुध्दतेबाबत शंका असल्यास कृषि विभागाच्या नजीकच्या कार्यालयास शेतकऱ्यांनी तक्रार - नोंदवावी. तालुका स्तरावर कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत. रासायनिक खते खरेदी करतांना परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे. रासायनिक खते खरेदी करतांना ई-पॉस मशीनद्वारेच खते खरेदी करावीत व तसा आग्रह कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना करावा. विक्रेत्याकडून खरेदी केल्यावर रासायनिक खताचे बील पावती मागून घ्यावी. खरेदी पावतीवर खताचे नाव, ग्रेड, किंमत, उत्पादकाचे नाव यांचा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे, याची खात्री करुनच बिलावर सही करावी. खत खरेदी करतांना खताचे व त्याच्या वजनाची खात्री करुन घ्यावी. संशयास्पद बनावट खत विक्री तसेच खताच्या कोणत्याही तक्रारीकरीता त्वरित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा. कमाल किरकोळ विक्री किंमतीच्या अत्यंत कमी अथवा जादा दराने विक्री होत असल्यास त्वरीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आव्हान देखील मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे.

## भारतीय सैन्यांचे मनोबल वाढवण्यासाठी माजलगावात भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय सैन्याने पाकिस्तानवर एयरस्ट्राईक केलेल्या कारवाईचे कौतुक करत सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी माजलगाव शहरांमध्ये दि १८ मे रविवार रोजी भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली.या भव्य मोटारसायकल रॅलीत शहरातील राष्ट्रप्रेमी,देशप्रेमी नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय सैन्याने पाकिस्तानवर केलेल्या एयरस्ट्राईक कारवाई करुन दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानातील अनेक



दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करत कारवाई केली आहे. याचा विजय उत्सव व भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी माजलगाव शहरांमध्ये भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली होती.सदरील भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान चौक, झेंडा चौक मार्गे आंबेडकर नगर पर्यंत भव्य तिरंगा मोटरसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये भाजपचे माजी अध्यक्ष अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके,भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, अच्युतराव लाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष संभाजीराव शेजूळ, अमरनाथ खुरपे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,गोविंद बजाज,प्रकाश दुगड,शशीकिरण गडम,अभय कोकड,बंडू खांडेकर, रूपालीताई कचरे, डॉ.अभिजीत सोळंके, भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर (माऊली) सरवदे, प्रल्हाद दळवी,शरद कचरे,आनंत कुलकर्णी,निरंजन वाघमारे, सत्यनारायण उनवणे,विनायक रत्नपारखी,ईश्वर खुरपे,अविनाश कांदुरे,पांडुरंग झोडगे,उमेश जाधव,राम शिंदे, नवनाथ गायकवाड, सुभाष साळवे, सुभाष कांबळे, खय्युम पठाण, कल्याण शेप,पवन मोगरेकर,रमेश शेंडगे,मनोज कोरडे नामदेव मुळे, यांच्यासह भारतीय जनता पार्टी, शिवसेना ,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष,माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक महिला यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.रॅलीत सहभागी सर्वांनी तिरंगा ध्वज हातात फडकवत या रॅलीने शहरवासी यांचे लक्ष वेधले. आंबेडकर नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीचा समारोप करण्यात आला.

## पान ६ वरून...

### मा. बाबाराजे देशमुख यांची

त्यामुळे अशा दोन समाज प्रेमी मित्राच्या सदिच्छा भेटीने त्यांच्यातील आनंद अधिक द्विगुणित झाला आहे.

यावेळी त्यांनी शिवराज एंटरप्राइजेसचे मालक मा.शिवराज अमृतराजे आजबे, यांना सौर ऊर्जा ही काळाची गरज लक्षात घेता, निवडलेल्या सोलर व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पत्रकार मा.शरद रेडेकर,वाघोली मांजरीचे युवा उद्योजक मा.राहुल शेठ उंदरे, टायगर रजनीश मेजर (पुणे),युवाउद्योजक प्रदीप सातव (पुणे), युवाउद्योजक रामभाऊ आव्हाळे (पुणे ), मा.अमृतराजे आजबे, युवा उद्योजक मा.तुषार काळे सर,युवा उद्योजक मा.अशोक शेठ भोसले,अध्यक्ष मा.प्रशांत दादा पोकळे,मा.चेतनशेठ मुळे,मा.जयदीप आजबे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

### लिटल फ्लॉवर समर कॅम्पच्या

यावी यासाठी संविधानाचा जागर मानवतेची विश्व प्रार्थना आणि गोष्टीरुपात महापुरुषांचे चरित्र मांडण्यात येणार आहे. असे प्रतिपादन मार्गदर्शिका नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाच्या उद्घाटिका सौ. शितल विनोद स्वामी-गोपीशेट्टी यांनी या कॅम्पच्या माध्यमातून बालकांना मुक्त अवकाशा बरोबरच देशप्रेम बंधुभाव सामाजिक सद्भावना रुचवण्याच काम केल जात हि गोष्ट अभिनंदनीय अशीच आहे. यातुन संस्कारक्षम पिढीचे बीजारोपण होत आहे अशी भावना व्यक्त केली.संचालिका स्नेहा दुधाळ आणि वैदेहि विधाते यांनी हा समर कॅम्प मोफत असुन कसल्याही प्रकारच साहीत्य घेऊन येण्याची सक्ती नाही. या उपक्रमातून हस्तकले बरोबरच योगा नृत्य अभिनयाचेही धडे दिले जाणार आहेत या उपक्रमाची सांगता दि २४ मे रोजी सायंकाळी नगर रोड येथील जोशी उद्यानात सहभागी बालकांबरोबर फन फेअर ने होणार असल्याचे सांगीतले.

### गेवराई: तय्यबनगरातील

करत मुस्लिम समाजासोबत दुजाभाव केल्याचा संतप्त सवाल उपस्थित केला.एजाज यांनी म्हटले की, माजी.आ अमरसिंह पंडित यांनी तय्यबनगरातील रहिवाशांना भावनिक करत पीटीआर मिळवून देण्याचे आश्वासन दिले आणि कार्यकर्त्यांकडून फॉर्म भरवून घेतले. मात्र, आता हा भाग विसरला गेला. ''जर इनामी जागेचे पीटीआर होऊ शकत नसतील, तर खोटी आश्वासने देऊन जनतेला मुर्खात का काढले? तय्यबनगरातील सर्व मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक षडयंत्रातून वंचित ठेवले,'' असे एजाज यांनी ठणकावले. त्यांनी माजी.आ.अमरसिंह पंडित यांना ''मुस्लिमांचे वावडे'' संबोधत, ''मुस्लिमांच्या पाठीत खंजीर खुपसण्याची त्यांची जुनी कार्यपद्धती'' असल्याचा घणाघात केला.उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यावरही एजाज यांनी निशाणा साधला. ''अजितदादांनी संजयनगर, साठेनगर येथे पीटीआर वाटप केले, पण तय्यबनगरातील गरिबांना का विसरले? हा मुस्लिम समाजासोबतचा भेदभाव आहे,'' अशी टीका त्यांनी केली. तय्यबनगरातील रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लवकरच आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी पंडित आणि पवार यांनी तातडीने पीटीआर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी दिला आहे.

## जालन्यात भाजपाची तिरंगा यात्रा संपन्न

### देश सैन्यांच्या व पंतप्रधानांच्या पाठीशी -रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. (ता.१८) रविवारी जालना शहरात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. यावेळी माजी मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे आणि भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, आ.नारायण कुचे, आ.बबनरावजी लोणीकर, माजी मंत्री आ.अर्जुनरावजी खोतकर, यांच्यासह जालना शहरातील नागरिक तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते.**

यावेळी श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले की, देश लष्कर आणि पंतप्रधान मोदींच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, ही यात्रा देशाची आहे. येथे अनेक लोक तिरंग्यासाठी उभे राहिले आहेत. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, देशभरात तिरंगा यात्रा काढली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने लष्करी शक्तीचा योग्य वापर करून जगाला संदेश दिला आहे की, भारत



दहशतवादाविरुद्ध गप्प बसणार नाही. भारतीय सैन्याने शौर्य दाखवले आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. तिरंगा हा आपल्या सन्मानाचे, प्रतिष्ठेचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. देशाची गौरवशाली परंपरा जाणून घेणे आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही यात्रा देशाच्या एकतेचे, अखंडतेचे आणि शूर सैनिकांना श्रद्धांजलीचे प्रतीक आहे असे हि ते म्हणाले. या तिरंगा यात्रांमध्ये माजी सैनिकांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यामध्ये देशप्रेमींनी भारत माता कि जय, इंडियन आर्मी झिंदाबाद, ऑपरेशन सिंदूर झिंदाबादच्या घोषणा दिल्या.हि तिरंगा पदयात्रा जनार्धन मामा चौक येथून सुरु होऊन स्वातंत्र्यवीर सावरकर चौक-टांगा स्टैन्ड्? ते बडी सडक येथील श्री राम मंदिर येथे महाआरती करून समारोप करण्यात आल. सदरील भव्य तिरंगा रॅली पदयात्रेस देशप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी या भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजक भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सर्व देशप्रेमींचे, माजी सैनिकांचे व जालना शहरातील नागरिकांचे सहभागी झाल्याबद्दल आभार मानले.

## माजलगावात कर्मयोग करिअर अकॅडमीचा सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षेत गुणवत्तेचा नवीन उच्चांक

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील कर्मयोग करिअर अकॅडमीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सीबीएसई दहावी परीक्षेत अभिमानास्पद कामगिरी केली आहे. कर्मयोग अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत १००% निकाल साध्य करून परत एकदा आपला शैक्षणिक गुणवत्तेचा नवीन उच्चांक प्राप्त केला आहे.याबद्दल बीड जिल्ह्यातील सर्वच स्तरावरून या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**

कर्मयोग अकॅडमीचा शौर्य मुगदिया याने ९९.४०% गुण प्राप्त केले असून बीड जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला आहे. त्यामुळे कर्मयोग अकॅडमीचे देखील नाव संपूर्ण बीड जिल्ह्यात अग्रस्थानावर घेतले जात आहे.

तसेच अकॅडमीच्या ४३ पैकी ६ विद्यार्थ्यांना ९६% च्या वर गुण असून, १८ विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. तसेच उर्वरित विद्यार्थ्यांपैकी १३ विद्यार्थी ८०% पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये राजनंदिनी बजाज (९७.४०%), समृद्धी कदम (९७.२०%) व सिद्धी कोठारी (९७.२०%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला आहे.

तसेच अनुश्री मोरे (९६.४०%), उत्कर्ष ढाकणे (९६.२०%), आयुष वाघमोडे (९४.२०%), प्रणव सोळंके (९३.८०%), प्रथमेश परदेशी (९३.८०%), नैतिक संचेती (९३.६०%), श्रीशा गोंडे (९३.२०%), रिद्धी कोठारी (९२.२०%), प्रज्वल कुलकर्णी (९२.२०%), जान्हवी भागवत (९१.२०%), अक्षरा भंडारी (९१.०० %), वेदिका तौर (९२.२०%), ऋषिकेश शेजुळ (९०.२०%) व साईराज चव्हाण (९०.००%) या विद्यार्थांनी ९०% पेक्षा जास्त गुण घेऊन यश संपादन केले आहे.या घवघवीत निकालासाठी घेतलेल्या मेहनतीसाठी विद्यार्थी व पालकांकडून कर्मयोग अकॅडमीचे संस्थापक कैलास काबरा सर व शिक्षकांचे अभिनंदन व कौतुक केल्या जात आहे. तसेच संस्थापक कैलास काबरा यांच्याकडून येणाऱ्या शैक्षणिक वर्षासाठी पुन्हा एकदा अशीच मेहनत घेऊन अशा प्रकारचे व याही पेक्षा अधिक यश प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे.

cmyk

# कर्जमाफीपासून वंचित २४८ शेतकऱ्यांनी घेतली उच्च न्यायालयात धाव

## न्यायालयाचा शासनाला १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे आदेश

नागपूर: शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीपासून राज्यातील सुमारे साडेसहा लाख शेतकरी आठ वर्षांपासून वंचित आहेत. शेतकऱ्यांप्रती उदासीन धोरण कारणीभूत असल्याचा आरोप करीत अडगाव बुद्रुक (जि. अकोला) येथील २४८ शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रीट याचिका दाखल केली आहे. यावर न्यायालयाने शासनाला १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे आदेश दिल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

अकोला जिल्ह्यातील अडगाव बुद्रुक येथील सेंट्रल कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या २४८ शेतकऱ्यांच्या वतीने नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. नापिकी, दुष्काळ, आत्महत्यांची वाढती संख्या लक्षात घेत शेतकऱ्यांचे थकित कर्ज माफ करून शेतकऱ्यांच्या शेतीविषयक अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने शासनाने कर्जमाफी योजना तयार केली होती. त्यानंतर मोठा गाजावाजा



करत २८ जून २०१७ ला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेची घोषणा केली. त्यात लाखो शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केली होती. परंतु आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही सुमारे सहा लाख ५६ हजार शेतकरी सहा हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीपासून वंचित असल्याचे सांगितले जाते. शेतकऱ्यांप्रती उदासीन धोरण असल्याने शासनाविरोधात अडगाव बुद्रुक सेंट्रल कृषक सोसायटीमधील कर्जमाफीपासून वंचित असलेल्या २४८ शेतकऱ्यांनी नागपूर खंडपीठाचे दरवाजे ठोठावले. न्यायमूर्ती नितीन सांबरे व वृषाली जोशी यांनी ही याचिका दाखल करून घेत राज्य शासनाला १२ जूनपर्यंत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. कर्जमाफी मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार शेतकरी अन्याय निवारण कृती समितीमार्फत शासन दरबारी पाठपुरावा केला. लोकप्रतिनिधींमार्फत सभागृहात आवाज उठविला, आंदोलने केली. परंतु या प्रकरणात काहीही झाले नाही. ॲड. अजय माहेश्वरी यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेतल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष मनोहरलाल फाफट यांनी दिली.

## सौर ऊर्जेच्या माध्यमातून दिवसा वीज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न - अजित पवार

राज्यात पीएम-सूर्य घर, मोफत वीज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजनिमिर्तीवर भर देण्यात येत आहे, आगामी काळात नागरिकांच्या वीज देयकात बचत करण्याच्या दृष्टीने दिवसा वीज उपलब्ध करून देण्यास शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

मुढाळे येथे महापारेषणच्या २२०/३३ के.व्ही. उपकेंद्राच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी महापारेषणचे मुख्य अभियंता अनिल कोळप, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता संदीप हाके, उप विभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, राजकुमार जाधव, संभाजी होळकर, सचिन सातव, ॲड. केशवराव जगताप उपस्थित होते. पवार म्हणाले की, शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरिता याकरिता सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. शेतात सौर कृषी पंप



देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपाना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे.

खरिपात बियाणे, खते, कीटकनाशके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न

खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे बियाणे, खते, कीटकनाशके उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा खरीप हंगाम आढावा आवश्यक ते नियोजन करण्यात येईल. याबाबतीत कुठलीही कमतरता भासणार नाही, याकरिता कृषी खात्यासोबत लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत दर्जेदार रोपे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

## सिमला मिरचीवर पडणारे रोग आणि नियंत्रण

आहारामध्ये भाजीपाल्याला खूप महत्व आहे. कारण यामध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह यांसारखी खनिजद्रव्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. तसेच अ आणि क जीवनसत्वेदेखील मोठया प्रमाणात असते. साहजिकच भाजीपाल्याचे महत्व वाढले असल्याने शेतकरीवर्ग भाजीपाला लागवडीकडे वळू लागला आहे. यामध्ये अनेकजण सिमला मिरचीचे उत्पादन घेतात.

सिमला मिरची आरोग्याच्या दृष्टीने खूप फायदेशीर असते. घरामध्ये तयार केलेली भाजी असो किंवा रेस्टॉरंटमध्ये बनवलेले चायनीज असो, प्रत्येक पदार्थाची चव वाढवण्याचे काम सिमला मिरची करत असते. त्यामुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारापेठांमध्ये सिमला मिरचीची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये मुबलक प्रमाणात पाणी असल्याने या मिरचीच्या लागवडीसाठी हा महिना उत्तम मानला जातो. जर तुम्ही लागवड करत असाल तर रोग आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय तुम्हाला माहिती असण्याची गरज आहे.

सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असणारे लहान लहान ठिपके पाहायला मिळतात. कालांतराने ते तपकिरी किंवा काळे होत जातात. हा रोग टाळण्यासाठी प्रतिकारक वाणांचा वापर करणे गरजेचे आहे. इतकेच नाही तर जमिनीमध्ये रोगजनकांना प्रतिबंध



करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत राहणे गरजेचे आहे. तसेच पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नये. कारण असे झाले तर देठ आणि फळांवर खोल जखम पाहायला मिळत असून यामुळे पाने कोमेजून कुजण्याची शक्यता असते. पानांवर जास्त पाणी आणि सिंचन टाळावे. त्याशिवाय रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाकावी ज्यात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशकाचा वापर करावा.

पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके पाहायला मिळतात. हा रोग टाळायचा असेल तर हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवणे गरजेचे आहे. प्रतिबंधात्मक उपायासाठी सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरणे गरजेचे आहे. याशिवाय सिमला मिरचीची पाने पिवळी पडून कोमेजतात. तर अनेकदा ही पाने पूर्णपणे कोमेजून जातात. जर तुम्हाला हे टाळायचे असेल तर रोगमुक्त बियाणे आणि रोपांचा वापर करावा. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत सिमला मिरचीची लागवड करावी. महत्त्वाचे म्हणजे या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नसल्याने प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष द्यावे. जर तुम्हीही सिमला मिरचीची लागवड करत असताना या गोष्टींचा विचार केला तर तुम्हाला भरघोस उत्पन्न मिळेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५६ : ब्रिटन देशाने फ्रांस देशाविरुद्ध युद्ध पुकारले.
१७७५ : मेरिकन क्रांती अमेरिकेने कॅनडाशी व्यापार बंद केला.
१७९२ : न्यू यॉर्क शेरबाजाराची स्थापना.
१८७२ : इंग्रज व मराठे यांच्यातील इतिहासप्रसिध्द सालबाईचा तह झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी बेल्जियममधील ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.
१९१५ : युनायटेड किंग्डमचे सरकार अल्पमतात येउन कोसळले.
१९४९ : भारताचा राष्ट्रकुलामध्ये राहण्याचा निर्णय.
१९८३ : लेबाननमधुन सैन्य काढुन घेण्याच्या करारावर लेबानन, इस्त्रायल आणि अमेरिकेने सह्या केल्या.
१९९० : जागतिक आरोग्य संघटनेने समलैंगिकता मानसोपचार रोगांच्या यादीतून काढून टाकले.
१९९५ : जॅक शिराक फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.
२००४ : अमेरिकेतील पहिला कायदेशीर समलिंगी विवाह झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४९ : देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर एडवर्ड जेन्नर यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८२३)
१८६५ : मुसलमानी काळापासून ब्रिटिश अमदानीपर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास लिहीणारे इतिहासकार रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचा जन्म. (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९५९)
१८६८ : डॉज मोटर कंपनी चे संस्थापक होरॅस डॉज यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९२०)
१८७८ : मुंबई प्रांताचे पहिले भारतीय राज्यपाल व महाराज हरि सिंह यांच्या कारकिर्दीतील जम्मू-काश्मीर प्रांताचे पंतप्रधान व जोधपुर चे दिवाण कपुरथला राजघराण्याचे राजा हरनाम सिंह यांचे पुत्र महाराजा सिंह यांचा जन्मदिन.
१८८८ : टिच फ्रीमन, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५ : भारतीय आसामी इतिहासकार, नाटककार, निबंधकार आणि लघुकथा लेखक नकुलचंद्र भुयान यांचा जन्मदिन.
१९३४ : ॲपल इन्क कंपनी चे सहसंस्थापक रॉनाल्ड वेन यांचा जन्म.
१९४५ : भागवत चंद्रशेखर, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९५१ : गझल गायक पंकज उदास यांचा जन्म.
१९६६ : सद्दाम हुसेन यांचा मुलगा कुसय हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९७९ : अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८६ : डीयेर एंड कंपनीची स्थापक जॉन डीयेर यांचे निधन. (जन्म: ७ फेब्रुवारी १८०४)
१९७२ : रघुनाथ कृष्ण फडके, शिल्पकार.
१९९६ : कसोटी क्रिकेटपटू रुसी शेरियर मोदी यांचे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९२४)
२००४ : कमिला तय्यबजी, वकील, समाजसेविका.
२००९ : सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता प्रकाश मेहरा यांचे निधन.
२०१२ : अमेरिकन गायिका डोना समर यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १९४८)
२०१४ : द लीला पॅलेस, हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स चे स्थापक सी. पी. कृष्णन नायर यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२२)

## फळे-भाज्यांना वॅक्सिंग करण्याच्या विविध पद्धती

निर्यातीसाठी प्रामुख्याने फळे आणि भाज्या दीर्घकाळ टिकणे गरजेचे असते. त्यासाठी त्यावर मेणाचा थर देण्याची पद्धती (वॅक्सिंग) वापरली जाते. त्याच्या हाताने लावणे, मेणामध्ये बुडविणे, मेणाची फवारणी करणे, ब्रश करणे यासारख्या अनेक पद्धती आहेत. या पद्धतींची निवड उत्पादनाचा प्रकार, आकार आणि वॅक्सिंग सामग्रीच्या स्वरूपानुसार केली जाते. या प्रत्येक पद्धतीचे स्वतःचे फायदे आणि मर्यादा असतात. ते लक्षात घेऊन योग्य त्या पद्धतीचा अवलंब केल्यास फायदा होतो.

हाताने मेण लावणे : मेण द्रवरूप करून फळांच्या पृष्ठभागावर हाताने किंवा मऊ कापडाच्या एकसमान थरामध्ये लावले जाते. ही एक साधी आणि सोपी पद्धत असून, प्रामुख्याने घरगुती किंवा कमी संख्येमध्ये उत्पादने असल्यास उपयुक्त ठरते. मात्र यासाठी मनुष्यबळ अधिक लागू शकते. त्याच प्रमाणे या पद्धतीत मेणाच्या थराची जाडी नियंत्रित करणे कठीण होते.

पद्धत : फळे आणि भाज्या स्वच्छ थंड किंवा कोमट पाण्याने धुऊन घ्याव्यात. त्यांच्या पृष्ठभागावरील धूळ, माती आणि रासायनिक अवशेष निघून जातील.

उत्पादने सुकवण्यासाठी कोरड्या आणि स्वच्छ कापडाने पुसून घ्यावीत. अधिक प्रमाणात उत्पादनासाठी हवेच्या झोत सोडून सुकविण्याची प्रक्रिया करता येते. नैसर्गिक मेण हे सौम्य तापमानावर गरम करून मऊ केले जाते. त्याचा फळावर हाताने थर देऊन पसरून घ्यावा.

अ) हाताने लावण्याची पद्धत :थोडेसे मेण हातावर घेऊन हलक्या हाताने फळाच्या किंवा भाज्यांच्या पृष्ठभागावर गोलाकार चोळत जावे.संपूर्ण पृष्ठभागावर थर व्यवस्थित पसरला असल्याची खात्री करावी.

ब) मऊ कापडाने लावण्याची : द्रवरूप केलेले



मेणामध्ये मऊ कापड बुडवून घ्यावे. ते कापड फळाच्या पृष्ठभागावर हळुवारपणे फिरवत जावे. सर्व भागांवर समान थर येईल अशा प्रकारे चोळावे. सर्व बाजूने एक सारखी चमक आल्यानंतर हवेशीर ठिकाणी काही काळासाठी ठेवावे.बुडविणे . जेव्हा मोठ्या प्रमाणात उत्पादनावर वॅक्सिंग करायचे असते, त्यावेळी वितळलेल्या मेणामध्ये अत्यंत अल्पकाळासाठी उत्पादने बुडविण्याची पद्धती राबवली जाते. यात मेणाच्या थराची जाडी नियंत्रित करणे तुलनेने सोपे आहे.मात्र मोठ्या प्रमाणात मेणांचा वापर होत असल्याने मेण वाया जाण्याचे प्रमाण जास्त राहू शकते. बाथमध्ये मेण काही प्रमाणात शिल्लक राहून जाते. या पद्धतीत सामान्यतः पॅराफिन वॅक्सचा वापर केला जातो.

पद्धत : स्वच्छ थंड किंवा कोमट पाण्याने फळे आणि भाज्या स्वच्छ धुऊन घ्याव्यात. त्यानंतर हवेच्या झोताद्वारे त्यांच्या पृष्ठभागावरील पाणी उडवले जाते. किंवा कोरड्या आणि स्वच्छ कापडाने पुसून घेतली जातात. नैसर्गिक वॅक्स गरम करून किंवा सौम्य तापमानावर ठेवून द्रव स्वरूपात आणावे. काही वेळा संपूर्ण मेणाऐवजी मेणासोबत काही प्रमाणात पाणी आणि अन्य सुरक्षित रसायने मिसळून 'इमल्शन' तयार केले जाते.

अशा द्रवामध्ये काही सेकंदासाठी फळे, भाज्या बुडवून त्वरित बाहेर काढल्या जातात. त्यामुळे त्याच्या पृष्ठभागावर एकसंध थर तयार होतो. वॅक्स समसमान पसरले आहे का, याची तपासणी करून मेणाची अतिरिक्त जाडी कमी केली जाते. त्यासाठी गरम हवेच्या झोताचा वापर केला जातो. त्यानंतर फळे / भाज्या कोरड्या व हवेशीर ठिकाणी ठेवल्या जातात.

ब्रशच्या साह्याने मेण लावण्याची प्रक्रिया (ब्रशिंग) वरील प्रमाणे फळे भाज्या स्वच्छ धुऊन कोरड्या केल्यानंतर मेण लावण्यासाठी ब्रशचा वापर केला जातो. त्यासाठी मेण गरम करून ते योग्य (५०-७० अंश सेल्सिअस ) तापमानाला आणावे. इमल्सिफाइड वॅक्स वापरत असल्यास, पाणी व अन्य घटक व्यवस्थित प्रमाणात मिसळल्याची व इमल्शन योग्य प्रकारे झालेले असल्याची खात्री करावी. त्यात स्वच्छ आणि मऊ ब्रश हलक्या हाताने बुडवून तो उत्पादनाच्या एकसंधपणे फिरवावा. त्यामुळे एकसमान जाडीचा पातळ थर लावला जात असल्याची खात्री करावी. त्यानंतर उत्पादन पूर्ण सुकण्यासाठी हवेशीर ठिकाणी ठेवावे.

पद्धत : वरीलप्रमाणे फळे आणि भाज्या स्वच्छ व कोरड्या करून घेतल्या जातात. प्रक्रियेसाठी वापरावयाचे मेण ५० ते ७० अंश सेल्सिअस तापमानावर गरम करून द्रव स्वरूपात आणले जाते. त्यात काही वेळा अन्नसुरक्षित इमल्सिफायर आणि संरक्षक घटक मिसळले जातात. हे गरम मेण एक्स्ट्रूजन मशिनमध्ये भरले जाते. त्याद्वारे मेणाचा पातळ आणि समान असा थर फळांच्या पृष्ठभागावर फवारला जातो किंवा कोटिंग केले जाते. ही प्रक्रिया अधिक चांगल्या प्रकारे होण्यासाठी फळे फिरवली जातात. त्यानंतर गरम हवेच्या साह्याने किंवा नैसर्गिकरीत्या वॅक्स कोरडे आणि सेट होऊ दिले जाते.

रोलर ब्रशिंग : रोलर ब्रशिंग ही औद्योगिक स्तरावर मोठ्या प्रमाणात फळे व भाज्यांच्या संरक्षणासाठी उपयुक्त आधुनिक पद्धत आहे. त्यासाठी रोलर ब्रश मशिन या खास यंत्राचा वापर केला जातो. फळे व भाज्या एका कन्व्हेअर बेल्टवर टाकली जातात. यात उत्पादने एका किंवा अधिक रोलर्सच्या मालिकेतून जातात. त्यावेळी त्याच्या पृष्ठभागावर फिरणाऱ्या ब्रशच्या मदतीने मेण लावले जाते. ही वेगवान आणि कार्यक्षम पद्धत आहे. यात मेणाच्या थराची जाडी आणि एकसमानता नियंत्रित करणे सोपे होते. काही यंत्रामध्ये ऑटोमॅटिक वॅक्स स्प्रेअर दिलेला असतो. त्याद्वारे स्वच्छ केलेल्या फिरत्या उत्पादनावर मेण किंवा मेणाचे इमल्शन अलगद फवारले जाते. त्यावरून पुन्हा रोलरचे ब्रश फिरले जातात. त्यामुळे त्यावरील अतिरिक्त मेणाचा थर कमी होतो. हा थर सुकविण्यासाठी हवेच्या झोताचा वापर केला जातो. त्यानंतर पॉलिशिंग ब्रशच्या मदतीने फळे अधिक चमकदार केली जातात.

रोलर ब्रशिंग पद्धतीचे फायदे : एकसंध वॅक्स कोटिंग : पृष्ठभागावर समसमान वॅक्स थर लावला जातो. वेगवान आणि कार्यक्षम प्रक्रिया : मोठ्या प्रमाणावर फळे व भाज्यांवर वॅक्स लावण्यासाठी ही पद्धत अधिक उपयुक्त आहे. फळांची चमक वाढते : ब्रशिंगमुळे फळे व भाज्या अधिक आकर्षक दिसतात.

फवारणी करणे

उत्पादनाच्या स्वच्छतेची सर्व प्रक्रिया वरीलप्रमाणेच असते. मात्र फवारणीसाठी मेण द्रावण तयार करण्याची पद्धती वेगळी असते. त्यासाठी मेण गरम पाण्यात मिसळून इमल्शन तयार करतात. त्यासाठी त्यात काही वेळा नैसर्गिक रेझिन किंवा खाद्य-द्रव्ये मिसळली जातात. त्यामध्ये एकजिनसीपणा आणण्यासाठी द्रावण गाळून घेतले जाते. अशा द्रावणाची फवारणी करण्यासाठी उच्च दाबावर कार्य करणाऱ्या नोझल वापरले जातात.

# देशमुख यांनी पत्रकारांसंबंधीत मांडलेल्या प्रश्नांचा शासन दरबारी पाठपुरावा करणार

## मंत्री नितेश राणे यांची ग्वाही: सिंधुदुर्ग येथे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

सिंधुदुर्ग

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी पत्रकारांसंबंधीत विविध प्रश्न, समस्या आज या अभिवादन सभेत मांडले आहेत. पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र सरकार नेहमीच प्रयत्नशील असते. यापुढेही यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावा नक्की केला जाईल,' अशी ग्वाही राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ आयोजित दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर अभिवादन सभा आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर स्मारक व पत्रकार भवन, सिंधुदुर्गनगरी येथे पार पडली. या कार्यक्रमात मंत्री राणे बोलत होते. याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी महिला अध्यक्ष शोभा जयपूरकर, सह प्रसिद्धी प्रमूख भारत निगडे, डिझिटल मीडिया परिषेदेचे अनिल वाघमारे, सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ अध्यक्ष उमेश तोरस्कर, परिषेदेचे माजी अध्यक्ष गजानन नाईक यांच्यासह राज्यभरातून आलेले पदाधिकारी उपस्थित होते.



### परिषद कार्यकारणीची झाली बैठक

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यकारणीची बैठक यावेळी पार पडले. या बैठकीत परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. तर बैठकीमध्ये सह राज्य प्रसिद्धीप्रमुख भारत निगडे, मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, पुणे अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीश पाटणे, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके यांनीही बैठकीत विविध प्रश्न मांडले.

याप्रसंगी बोलताना मंत्री नितेश राणे म्हणाले,'बदलत्या काळानुसार पत्रकारिता बदलत चाललेली आहे. पत्रकाराने पत्रकारिता करताना नैतिकता पाळणे तितकेच महत्त्वाचे आहे. आगामी काळात एआय सारख्या तंत्रज्ञानाचा देखील समावेश पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्या दृष्टीने ही पत्रकारांनी स्वतः मध्ये बदल करणे गरजेचे आहे.'पालकमंत्री नितेश राणे यांनी यावेळी मराठी पत्रकार परिषदेच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले, 'मराठी पत्रकार परिषद ही सर्वात जुनी असणारी संस्था असून येथे आज संपूर्ण महाराष्ट्रातून पत्रकार आले आहेत. यावरूनच या परिषदेचे महत्त्व अधोरेखित होत आहे. आगामी काळात परिषदेला शासकीय पातळीवर आवश्यक असणारी मदत करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील,' असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी सांगितले की, 'आज आपण एका महापुरुषाच्या भूमीमध्ये वंदन करण्यासाठी आलेलो आहोत. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांची जन्मभूमी असणाऱ्या जिल्ह्यामध्ये येऊन अभिवादन करण्यासारखी भाग्याची दुसरी कोणतीही गोष्ट नाही. आज हे भाग्य आपल्या सर्वांना लाभले आहे. आज या ठिकाणी अहिल्यानगर, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, बीड, नाशिक, धुळे, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर अशा राज्याच्या विविध भागातून पत्रकार आलेले आहेत. खरंतर कोकणची भूमी ही महापुरुषांची भूमी आहे. येथेच बाबुराव पराडकर यांच्यासारखे हिंदी भाषेत आपलं वर्चस्व स्थापित करणारे पत्रकार घडले आहेत. त्यामुळे बाबुराव पराडकर यांचे ही स्मारक पराड येथे व्हावे, अशी आमच्या संघटनेची मागणी आहे.' यावेळी एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांचे प्रश्न व त्यांना येणाऱ्या अडचणी सविस्तरपणे मांडतानाच त्या सोडवण्यासाठी शासकीय पातळीवर पाठपुरावा करण्याची मागणी ही राणे यांच्याकडे केली. जिल्हाधिकारी अनिल पाटील, परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सिंधुदुर्ग पत्रकार जिल्हा संघाचे अध्यक्ष उमेश तोरस्कर, जिल्हा माहिती अधिकारी चिलवणकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषदेचे माजी अध्यक्ष गजानन नाईक यांनी तर सूत्रसंचालन गणेश जेठे यांनी केले.

### आ.राणे व दीपक केसरकर यांनी दिल्या शुभेच्छा

मराठी पत्रकार परिषदेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शिवसेनेचे आमदार दीपक केसरकर हे दूरध्वनीद्वारे सहभागी झाले होते. त्यांनी सर्व पत्रकारांचे स्वागत करताना सांगितले की, 'पत्रकारांना आवश्यक असणारे सहकार्य करण्यासाठी सरकार नेहमीच पुढे राहील. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर हे आमच्या जिल्ह्यातील होते, याचा आम्हाला अभिमान आहे.' तर आमदार नितेश राणे यांनी कार्यक्रमस्थळी भेट देत आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करतानाच सांगितले की, 'देशाचे भविष्य हे पत्रकारितेवर अवलंबून आहे. आताची पत्रकारिता महत्त्वाच्या वळणावर आहे. अशा काळात आगामी काळात पत्रकारांनी देखील जबाबदारीने काम करताना वेळप्रसंगी आत्मपरीक्षण करण्याची ही गरज आहे.'

## थोडक्यात

### प्रकाश बोदवडे यांचे निधन

जालना । प्रतिनिधी



श्रमिक चळवळींचा बुलंद आवाज आणि कामगारांच्या हक्कासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे ज्येष्ठ समाजसेवक कॉमरेड प्रकाश बोदवडे यांचे शनिवारी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या अनेक दशकांपासून ते शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करत होते. त्यांच्यावर शनिवारी दुपारी रामतीर्थ स्मशानभूमी, जालना येथे क्रांतिकारी परंपरेनुसार ''लाल सलाम'' देत अंत्यसंस्कार करण्यात आले.

या वेळी मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ट्रेड युनियन प्रतिनिधी, विद्यार्थी संघटना आणि मानवाधिकार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रद्धांजली सभेस कॉमरेड भवते, कॉमरेड भीमराव बनसोडे, कॉमरेड मारुती तेगमपुरे, कॉमरेड बाबूराव कावळे, कॉमरेड भगवान भोजने, कॉमरेड वैजिनाथ लोंढे, कॉमरेड अशोक साबले, कॉमरेड शेलके (एनआरबी), कॉमरेड प्रल्हाद पडूळ, कॉमरेड मधुकर मोकळे, कॉमरेड ज्ञानोबा वरवटे, कॉमरेड सोनवने, कॉमरेड सोहब बोदवडे, कॉमरेड बुद्धिनाथ बराळ, अ‍ॅड. अनिल मिसाळ, कॉ. बाबासाहेब पाटोळे, कॉ. अनिल गायकवाड, जगन वाघमोडे, प्रेमदास राठोड, आरिफ कुरैशी, नारायण मुंढे, गणेश मेहत्रे, इमरान सिद्दीकी, मयुर राऊत, भगवान अंभोरे, मनोज बसैय्ये, अमन गिरी अमोल टाकलकर आदींनी उपस्थित राहून कॉमरेड प्रकाश बोदवडे यांना क्रांतिकारी लाल सलाम अर्पण केला.

### कु.नुपुर उपाध्ये हिचे यश



अंबड: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात अंबड येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कुलची विद्यार्थीनी कु.नुपुर किरण उपाध्ये हीने ९२.४० टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन केले आहे.या यशाबद्दल तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## रेल्वे मार्गावर फुल उभारण्याची बाहेगव्हाण करांची मागणी

वडवणी। प्रतिनिधी

नगर बीड परळी रेल्वे मार्गामुळे बाहेगव्हाण वडवणी शिवाराचे दोन भाग झाले आहेत. या मार्गावर पूल नसल्यामुळे शेतकरी शेतमजूर आणि व्यवसायिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ पुलाची उभारणी करावी अशी मागणी बाहेगव्हान आणि वडवणी येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केलेली आहे.

मागील पाच वर्षापासून बाहेगव्हाण आणि वडवणी येथील नागरिक जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. त्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदने दिले आहेत. बीड नगर परळी रेल्वे मार्ग वडवणी येथून जात असून रेल्वेमार्गासाठी खोलवर खोदकाम करण्यात आलेले आहे. सदर रेल्वे मार्ग झाल्यामुळे शिवाराचे दोन भाग झाले आहेत. पलीकडील बाजूस



जाता येत नाही. शेळी मेंढी पालन करणाऱ्यांचे हाल होत आहेत. त्याचबरोबर पलीकडील शेतकरी शेतमजुरांना प्रवास करता येत नाही. धार्मिक कार्यक्रमास रेणुका माता मंदिर आणि पावतका मातेच्या मंदिरात देखील भाविकांना जाण्यासाठी रस्ता नाही त्याचबरोबर ग्रामीण रुग्णालय चिंचवन या ठिकाणी रुग्णांना देखील जाण्यासाठी अडचण येत आहे. सदर मार्ग हा धारूर रस्त्यासाठी बायपास असून या ठिकाणी जर पूल केला तर ग्राहकांची मोठी सोय होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून या ठिकाणी तत्काळ पूल उभारण्यात यावा अशी मागणी बाहेगव्हान आणि वडवणी शहरातील नागरिकांनी केले आहे. या बाबीकडे गंभीर दखल देऊन जिल्हाधिकारी बीड यांनी नागरिकांची गैरसोय टाळावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत

## पोलिसांवर दगडफेक दोन पोलिस जखमी

जालना। प्रतिनिधी

पोलिसांवर दगडफेक करून दोन पोलिसांना जखमी करण्यात आले तसेच पोलिस उपनिरीक्षक यांची गाडी फोडण्यात आली. गोंदी पोलिस ठाण्याचे पोलिस गोंदी तांडा (वैतागवाडी) येथे संशयित दुचाकी चोरीप्रकरणी कारवाई करण्यासाठी या दरम्यान पोलिसावर दगडफेक करण्यात आली. या घटनेत दोन पोलिस कर्मचारी जखमी झाले असून, उपनिरीक्षक किरण हावले यांच्या खाजगी चारचाकी वाहनाचे तोडफोड करून नुकसान केली.

शनिवारी सकाळी ११ वाजता पोलिस उपनिरीक्षक किरण हावले, जमादार अशोक नागरगोजे, जमादार चरणसिंग बामणवात, व पोलिस कर्मचारी शाकेर सिद्दिकी यांना गुप्त माहिती मिळाली की, गोंदी तांडा येथील वडार वस्तीवर दुचाकी चोरीतील एक संशयित आरोपी वास्तव्यास आहे. त्यानुसार सदर पोलिस पथक कारवाईसाठी तेथे गेले. संशयित आरोपीला राहत्या घरातून पकडताच, दोन पुरुष व एक महिलेसह अन्यांनी अचानक दगडफेक सुरू केली. या दगडफेकीत पोलिस कर्मचारी शाकेर सिद्दिकी यांच्या डाव्या हाताला आणि अशोक नागरगोजे यांच्या पायाला दगड लागून ते जखमी झाले. दरम्यान, हल्ल्याचा फायदा घेत संशयित आरोपी पळून गेला. या गोंधळात उपनिरीक्षक किरण हावले यांच्या खाजगी कार (क्रमांक -२५--२२२६) वरही दगडफेक झाली. यामध्ये कारच्या मागील काच फोडण्यात आला. या हल्ल्यानंतर आरोपीसह तीन पुरुष आणि दोन महिला घटनास्थळावरून फरार झाले. जखमी पोलिसांना शहागड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. तसेच दगडफेक करणारे लोकांवरील गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.

## मंगळवारी गुजर समाज देवसेनेची महत्वपूर्ण बैठक

बीड । प्रतिनिधी

दि.२० मे २०२५ मंगळवार रोजी जिल्ह्यातील गुजर समाज देवसेनेची विविध विषयावर प्रश्नांसाठी महत्वपुर्ण बैठक पंढरी कॉम्प्लेक्स, धानोरा रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे या ठिकाणी तालुका जिल्हा पदाधिकारी निवडण्याची प्रक्रिया देखील होणार आहे तरी ज्यांची इच्छा असेल त्यांनी संपर्क साधून चर्चा करावी आणि सदरील बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर यांच्या वतीने करण्यात आले आहे

दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच समाज बांधव-भगिनींसाठी, समाजातील छोट्या-मोठ्या अडचणी सोडवण्यासाठी या बैठकीच्या माध्यमातून पदाधिकार्यांची बांधणी करावयाची आहे. आपल्या संघटनेतला माणूस आपापल्या सोयीनुसार कोणत्याही पक्षाचे काम करू शकतो त्याला बंधन नाही आपण फक्त समाज म्हणून समाजाच्या अडीअडचणीसाठी एकत्र येऊन समस्या सोडवण्याचे हेच एक उद्दिष्ट आपल्या डोळ्यासमोर आहे. तसेच आपल्या समाजाचे अनेक कर्मचारी वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत त्यांना राजकीय लोकांचा त्रास होत आहे त्याच्यासाठी आपल्याला काय करता येईल हेही विचार करणे आवश्यक आहे गुजर समाजाच्या प्रत्येक व्यक्तीच्या अडचणी आपण समजून घेऊ शकतो का याच्यावर विचार मंथन करणे गरजेचे आहे ही संघटना आपल्या समाजाला न्याय देण्याचे प्रयत्न करेल असे आयोजकांनी सांगितले तसेच ज्यांना काही कारणाने बैठकीला येणे शक्य होणार नाही त्यांनी देखील जिल्हाध्यक्ष यांच्या ९४२०६५७९९७ या क्रमांकावर आपले म्हणणे मांडावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## घरणीकर ते जिजामाता रस्त्याचे खड्डे बुजवले

### अँड.मनोज संकाये यांच्या मागणीची नगरपालिकेचे मुख्याधिकाऱ्याकडून दखल

परळी। प्रतिनिधी

परळी शहरातील सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांच्या मागणीची दखल परळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी घेतली असून धरणीकर रोड ते जिजामाता उद्यान पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे बुजवण्यात आले आहेत. उर्वरित शहरातील रस्त्याचे खड्डे बुजवणार असे आश्वासन मुख्याधिकारी साहेबांनी दिले होते ते आश्वासन त्यांनी पूर्ण केले. म्हणून त्यांनी केलेल्या मागणीला यश मिळाले आहे.

बस स्थानकापासून घरणीकर मार्ग सुरू होतो तो जिजामाता उद्यानापर्यंत जाऊन मिळाला आहे. याच रस्त्यावर सोमवारी आठवडी बाजार भरवला जातो. आठवडी बाजारामध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती असते. या महिला खरेदी आणि विक्रीसाठी आठवडी बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात येतात मात्र



रस्त्यावरील अतिक्रमणामुळे त्यांची गैरसोय होते तसेच या रस्त्यावर वाहनांची रहदारी मोठ्या प्रमाणावर आहे त्याचाही त्रास सामान्य नागरिकांना आणि विशेष वडीलधारी मंडळी व महिलांना होतो आणि रस्त्यावर खड्डे पडल्याने चालणे अवघड होत होते. या संदर्भाने अँड.मनोज संकाये यांनी वेळोवेळी बातमी देऊन त्याचा पाठपुरावा केला याचा परिपाक म्हणून शहरातील पडलेले रस्त्यावरील खड्डे बुजवली आहेत. सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित दादा पवार साहेब हे परळी मध्ये येत आहेत त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने खड्डे बुजवले असावेत अशी कुजबुज परळीकरांमध्ये आहे. आतापर्यंत वेळोवेळी मागणी करून सुद्धा खड्डे का बुजवले नाहीत आताच का बुजवले असा प्रश्न सामान्य परळीकरांच्या चर्चेमध्ये आहे त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार येत असल्यामुळे हे काम होत आहेत अशी लोकांमध्ये चर्चा सुरू आहे.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे पुरस्कार जाहीर

## ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना नागोजीराव दुधगावकर पुरस्कार

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणारा ''आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार'' यंदा ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना तर नागोजीराव दुधगावकर पुरस्कार बीडचे दैनिक सुराज्यचे ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना देण्यात येत असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली. यावेळी एस.एम.देशमुख यांनी परिषदेचे अन्य पुरस्कार देखील जाहीर केले आहेत. अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी विविध पुरस्कारांनी राज्यातील पत्रकारांना सन्मानित केले जाते.. २०२४ च्या पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली.. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.. २५, ००० रूपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.. यापुर्वी हा पुरस्कार मा. गो. वैद्य, दिनू रणदिवे, पंढरीनाथ सावंत, प्रकाश जोशी आदि मान्यवर पत्रकारांना देण्यात आला



आहे..जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे.. परिषदेच्यावतीने इतरही पुरस्कार दिले जातात. परिषदेचे माजी अध्यक्ष आचार्य अत्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांना जाहीर झाला आहे.. इलेक्ट्रॉनिक मिडियासाठीचा शशिकांत सांडभोर पुरस्कार अभिजित करांडे यांना दिला जात आहे.

प्रमोद भागवत स्मृती पुरस्कार अमेय तिरोडकर यांना, भगवंतराव इंगळे स्मृती पुरस्कार अंमळनेर येथील पत्रकार पांडुरंग पाटील यांना, नागोजीराव दुधगावकर पुरस्कार बीड येथील सुराज्य दैनिकाचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना, दत्ताजीराव तटकरे स्मृती पुरस्कार गोवा सकाळचे संपादक दिनेश केळुसकर यांना महिला पत्रकारांसाठी असलेला सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार सिंधुदुर्ग येथील सीमा मराठे यांना जाहीर करण्यात आला आहे.. कृषी क्षेत्रातील पत्रकारांसाठी यावर्षी पासून माणिकराव देशमुख कृषी पत्रकारिता पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.. तो अँग्रोवनचे पत्रकार बाळासाहेब पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिध्दीचे काम उल्लेखनीय करणारया राज्यातील प्रसिद्धी प्रतिनिधींना दिला जाणारा संतोष पवार स्मृती पुरस्कार यंदा पुणे येथील भरत निगडे यांना जाहीर करण्यात आला आहे. एस.एम.देशमुख यांनी सर्व पुरस्कार प्राप्त पत्रकारांचे अभिनंदन केले आहे. आज बाळशास्त्री जांभेकर यांची १७९ वी पुण्यतिथी होती.. त्यानिमित्त बाळशास्त्री जांभेकर स्मारकात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.. तसेच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक सभा देखील आज बाळशास्त्री जांभेकर स्मारक सिंधुदुर्ग येथे पार पडली त्यावेळी या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यावेळी परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, माजी अध्यक्ष गजानन नाईक, सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश तोरसकर, गणेश जेठे आदि उपस्थित होते. संपादक गावरस्कर यांना नागोजीराव दुधगावकर पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांचे विभागीय सचिव रवी उबाळे ,समन्वयक सुभाष चौरे ,कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, संपादक राजेंद्र होळकर, संपादक राजेंद्र आगवान, संपादक दिलीप खिस्ती, परिषदेचे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक दत्ता आंबेकर, समन्वयक अभिमन्यू घरत,तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे आदींनी अभिनंदन केले.

## पाटोदयात कुस्तीचा थरार; मान्यवरांच्या उपस्थितीत अखाडा गाजला



पाटोदा। प्रतिनिधी

जय हनुमान तालीम यांच्या वतीने पाटोदा येथे पार पडलेल्या भव्य कुस्ती दंगलीत रंगलेल्या दमदार झुंजींनी कुस्तीप्रेमींना अक्षरशः भारावून टाकले. नामवंत पैलवानांनी सहभाग घेतलेल्या या कुस्ती स्पर्धेत अखाड्यात एकापेक्षा एक जोरदार लढती रंगल्या.या भव्य कुस्ती फडाला ह.भ.प. रंधवे बापू महाराज, आमदार सुरेश धस,माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला अधिकच भारदस्त स्वरूप प्राप्त झाले.

कुस्ती संपल्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे व पाहुण्यांचे स्वागत व आभार जय हनुमान तालीमचे प्रमुख वस्ताद पैलवान बाळासाहेब आवारे यांनी केले. त्यांनी कुस्ती ही केवळ ताकदीची नव्हे, तर शिस्त, संयम आणि संस्कारांची शाळा असल्याचे नमूद केले.अखेरपर्यंत रंगतदार झालेल्या या कुस्ती दंगलीत प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत पैलवानांचे कौतुक केले. पारंपरिक खेळांची गोडी आणि गावागावात त्याचा ठसा जपण्याचे कार्य जय हनुमान तालीम करत असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

# आरोपी कोणीही असू द्या ; संघटित हल्ला करणाऱ्यांवर मोक्का लावा - राजेसाहेब देशमुख

## शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**मयत संतोष देशमुख पार्ट-२ करायचा अशा नीच मानसिकतेतून शिवराज दिवटे (रा.परळी वैजनाथ) या तरूणाचे शुक्रवारी संध्याकाळी अपहरण करून त्याला लाकूड, लोखंडी रॉड, कत्तीने मारहाण केली. डोक्यात बाटलीही फोडली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून काही जणांना अटकही केली आहे. असे समजते. आम्ही या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो आहोत. आरोपी हा कोणीही असू द्या, कोणत्या ही जाती-धर्माचा असू द्या संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून निरापराध लोकांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर तात्काळ मोक्का लावा, अशा गुंडांची पोलिसांनी गावातून धिंड काढावी. त्यांचेवर कायद्याचा जरब बसवून अशा प्रवृत्ती ठेचून काढा. शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना, पोलिस आयुक्त व बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांना लवकरच भेटणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले.**

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख म्हणाले की, बीड जिल्ह्यातील परळी येथे शुक्रवारी संध्याकाळी शिवराज दिवटे या तरूणाला एका टोळक्याने अपहरण करून त्याला रत्नेश्वर डोंगराच्या भागात नेले आणि बांबू, लाकडाने अमानुष व बेदम मारहाण केली, डोक्यात काचेची बाटली फोडली. या टोळीकडे लोखंडी रॉड आणि कत्तीसारखी घातक शस्त्रे असल्याचे ही समजते. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मारहाण झाल्यानंतर शिवराज हा गंभीर जखमी झाला होता. त्याला तात्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकारानंतर शनिवार रोजी आम्ही जखमी शिवराज दिवटे व कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी शिवराजने आपल्याला लोखंडी रॉड आणि कत्तीने मारहाण झाल्याचे आम्हाला सांगितले. तसेच टोळक्यातील काहीजण, याचा संतोष देशमुख पार्ट-२ करायचा, असे म्हणत असल्याचेही शिवराजने सांगितले. खरे तर शिवराज हा जलालपूर येथे सप्ताहाच्या जेवणासाठी गेला होता. जेवणानंतर तिथे या टवाळखोरांना गावातील काही जणांनी मुलींची छेडछाड करण्यापासून रोखले होते. यावेळी शिवराज हा तिथे फक्त उभा होता. त्यानंतर शिवाजीनगरला तो मित्राला सोडून रिलायन्स पेट्रोल पंपाकडे जात होता. यावेळी जलालपूर येथील घटनेचा राग मनात धरून रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ पाच गाड्यावरील पोरांनी रस्ता रोखत शिवराजला मारहाण केली आणि त्याला बळजबरीने रत्नेश्वर डोंगरावर घेऊन गेले. त्याला मारहाण करताना ते टोळके बोलत होते की, याला सोडायचे नाही, आता याचा संतोष देशमुख पार्ट-२ करायचा. परंतु, तेथील दोन माणसांनी जर शिवराजला मारताना वेळीच बघितले नसते तर तो आज जिवंत ही राहिला नसता. त्यामुळे या विकृतीला काय म्हणणार ? गुन्हेगाराला आणि गुन्हेगारीला जात नसते आणि गुन्हेगारी कोणाचीही असेल तर ती वाईटच असते, बीडमध्ये वाढणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांनी आता धडक मोहीम राबवावी. मोक्कार तरूणांवर, अपप्रवृत्तींवर कायद्याची



जरब बसवली पाहिजे, गुन्हेगारांना अद्दल घडवली पाहिजे, बीड जिल्ह्यात बिहारला ही लाजवेल असा बिनधास्त गुन्हेगारीची मानसिकता असलेला नवा ट्रेंड सुरू झालाय तो थांबवा. बीड जिल्ह्यातील तरूण आज गुन्हेगारीच्या विळख्यात अडकला आहे. मारहाण, अपहरणाचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल करून समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न विकृत टोळके करीत आहेत. त्यामुळे याच्या प्रतिबंधासाठी पोलिसांनी वेगळे पथक नेमावे, स्थानिक पातळीवर पोलिसांनी गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम करावी, प्रसंगी गुन्हेगारांच्या आर्थिक स्रोतांवर गदा आणा. अशा लोकांवर पोलीसांची करडी नजर असणे ही तितकेच आवश्यक आहे. शिवराज दिवटे प्रकरण केवळ एक गुन्हेगारी घटना नाही. तर ती सामाजिक व्यवस्थेतील अस्वस्थतेची जाणीव करून देते. स्व.संतोष देशमुखांपासून ते शिवराज दिवटेपर्यंत ही मालिका फक्त नावं बदलते आहे. पण, मूळ कारणं तीच आहेत, संघटित गुन्हेगारीचा पॅटर्न मात्र तोच दिसतो आहे. सत्ता, वर्चस्व, कायद्याच्या भीतीचा अभाव. आता बीड जिल्ह्याने ठरवलं पाहिजे की, यापुढे अशा घटना आपल्या परिसरात सहन केल्या जाणार नाहीत. समाजाने, प्रशासनाने आणि सर्वपक्षीय राजकीय नेतृत्वाने एकत्र येऊन अशा संघटित हिंसेविरूद्ध उभं राहणं ही काळाची गरज आहे. अन्यथा उद्याचं बीड हे सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचं नंदनवन होईल. चांगल्या लोकांना जगणे मुश्किल होईल. म्हणून अजून वेळ गेलेली नाही. संघटित गुन्हा वेळीच रोखला जावा, अशा हिंसक घटनांमागील राजकीय पाठबळ, धागेदोरे यांचा शासन व प्रशासनाने शोध घेवून ते सत्य समाजासमोर आणले पाहिजे. आम्ही या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो आहोत. आरोपी हा कोणीही असू द्या, कोणत्या ही जाती-धर्माचा असू द्या संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून निरापराध लोकांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर मोक्का लावा, अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांची पोलिसांनी गावातून धिंड काढावी. त्यांचेवर कायद्याचा जरब, धाक बसवून अशा प्रवृत्ती ठेचून काढा. त्यांना प्रतिबंध करा, अशा खलप्रवृत्तींना कुठलीही माफी देवू नये. तर कठोर कारवाईचे शासन करावे अशी राज्य सरकारकडे विनंती व मागणी करून शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पोलिस आयुक्त आणि बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नवनित कॉंवत यांना लवकरच भेटणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले.

# शिवसंग्रामचे पन्नास हजार प्राथमिक आणि दहा हजार सक्रिय सदस्य तयार करण्याचे उद्दिष्ट - डॉ. ज्योती मेटे

### पिंपळनेर,पेंडगाव, मांजरसुंबा याठिकाणी शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात; सदस्य नोंदणीस प्रचंड प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम सभासद नोंदणी अभियानाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या सुचनेनुसार बीड जिल्ह्यात १ मे पासून सुरू असलेल्या सभासद नोंदणी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दी. १४ मे आणि १७ मे रोजी पिंपळनेर, बहीरवाडी सर्कल आणि नेकनुर सर्कल येथील पिंपळनेर,पेंडगाव, मांजरसुंभा येथे सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले यात तिन्ही ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत शिवसंग्राम चे प्राथमिक सदस्य होता आहेत. यात पेंडगाव आणि मांजरसुंभा येथील सदस्य नोंदणी अभियानास डॉ. ज्योती मेटे यांनी हजेरी लावत सदस्य नोंदणीचा उत्साह वाढवला.

उपस्थित पदाधिकाऱ्यांना सभासद नोंदणी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले तसेच मोठ्या उत्साहात अभियानाचे संपूर्ण




नियोजन करून सदस्य नोंदणी अभियानाला शुभारंभ करण्यात आला. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांचा सदस्यता नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. आगामी काही दिवसात पन्नास हजार प्राथमिक सदस्य आणि दहा हजार सक्रिय सदस्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शिवसंग्रामचे संस्थापक लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी शिवसंग्राम चे पदाधिकारी, कार्यकर्ते जिल्हा ,तालुका, सर्कल आणि गावोगावी काम करत आहेत. असे प्रतिपादन याप्रसंगी डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

यावेळी यावेळी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे, शहराध्यक्ष सुहास पाटील,उपाध्यक्ष सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, पंचायत समिती मा. सभापती ज्ञानेश्वर कोकाटे,संचालक सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, धर्मराज मागदे सर, सुनील शिंदे, राजेंद्र आमटे , कचरू महाराज कदम, राजेश्वर सातपुते, मा. पं. स.सदस्य किशोर काळकुटे, सरपंच सोमनाथ पवार,उपसरपंच चद्रकांन्त कोसले,

कृष्णा भागडे, श्रीराम घोडके, जीएस चौधरी, अजिंक्य जगदाळे, जगन्नाथ घोडके ,महारुद्र वाणी, शेख नासिर, संतोष चौधरी, गणेश चौधरी, विशाल रसाळ, सखाराम काळकुटे, जालिंदर सावंत, गणेश कदम ,अमोल सावंत, कृष्णा सावंत ,सुभाष काळकुटे, दत्ता जगदाळे, गणेश जगदाळे ,अतुल बडगे ,सतीश कागदे आदी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार आज सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे.**



सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ११.३० वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ११.३० ते १२.३० राखीव.

दुपारी १२.४५ वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी १२.५० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १.१५ वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी १.२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी १.३० वाजता बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक. दुपारी ३.३० वाजता बीड जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व सन २०२५-२६ आढावा बैठक. सायं. ४.३० वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. नंतर पत्रकार परिषद. त्यानंतर मोटारीने गेवराईकडे प्रयाण. सायं ७.०० वाजता कृष्णाई निवास, जुन्या बस स्टँड समोर, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.०० वाजता राखीव . नंतर मोटारीने प्रयाण. सायं ७.३० वाजता आर.बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.३० वाजता विविध विकास कामांचा शुभारंभ. नंतर राखीव. रात्री ९.४५ वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण.

# बाबाराजे देशमुख यांची शिवराज सोलर इंटरप्राईजेसला सदिच्छा भेट

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात तरुणांच्या गळ्यातला ताईत बनलेले, मराठा साम्राज्य संघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा.बाबाराजे देशमुख यांनी नुकतीच आष्टी येथे मा. अमृतराजे आजबे पाटील यांच्या शिवराज इंटरप्रायजेस सूर्योदय सोलर पॉवर कंपनीच्या व्यावसायिक कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता.त्यांचे इंटरप्राईजेस चे सर्वेसर्वा मा.अमृतराजे आजबे व शिवराज अमृतराजे आजबे यांच्यासह मित्र परिवाराकडून सत्कार करत , हृदयपूर्वक स्वागत करण्यात आले सत्कार प्रसंगी बोलताना म्हणाले की,सोलरसाठी



शासनाच्या वतीने ७८ हजार रुपये अनुदान देण्यात येत आहे. ग्राहकांनी विश्वासार्हता जपणाऱ्या, आपल्या आष्टीतील या एजन्सीच्या माध्यमातून जरूर लाभ घ्यावा असे आवाहन करत,शिवराज इंटरप्राईजेसची ग्राहकाच्या उदंड प्रतिसादाने व्यावसायिक भरभराट होवो अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

तसं पाहायला गेलं तर बाबाराजे देशमुख आणि अमृतराजे यांचे अनेक वर्षाचे घनिष्ठ संबंध आहेत. बाबाराजे देशमुख यांचे सामाजिक चळवळीतील योगदान फार मोठे आहे. महाराष्ट्राच्या समाजकारणात त्यांचा मोठा धबधबा आहे. त्यांच्या या कार्याने प्रेरित होऊन त्यांना मानणारा मोठा चाहता वर्ग महाराष्ट्राच्या विविध भागात निर्माण झाला आहे. मित्रत्वाचे नाते ते अधिक चांगल्या प्रकारे जपत असतात. त्यापैकीच एक जिवलग मित्र असलेले,आष्टीतील अमृतराजे आजबे आणि त्यांचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे मैत्री संबंध आहेत.अमृतराजे आजबे यांचे देखील महावितरणच्या प्रशासकीय जबाबदारी सोबत, विविध सामाजिक कार्यातील भरीव योगदान आहे.समाजातील गरजूंना अडचणीच्या काळात मदतीला धावून जाण्याचे काम नेहमी त्यांच्या माध्यमातून होत असत.

पान ३ वर

# झेडपीत बदल्यानंतरही पुन्हा तिथेच कामकाज; पदभार काढण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेते सरसावले

### राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांचे सीईओंसह पालकमंत्री अजित दादांनाही पत्र

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेत प्रशासकिय बदली होऊनही कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पदभार दिले जात आहेत. तब्बल ७७ कर्मचारी दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करत असल्याने संबधित विभागात अनागोंदी निर्माण झालेली आहे. यामुळे संबधितांचे अतिरिक्त पदभार काढावेत, अशी मागणी सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नेते बळीराम गवते यांनी सीईओ आणि पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. तसे सविस्तर पत्रही दिले आहे.



पत्रात म्हटले आहे, जिल्हा परिषद बीड अंतर्गत ७७ कर्मचारी यांची एकाच कार्यालयात १० वर्षापेक्षा जास्तु सेवा झालेली असल्याने शासन नियमाप्रमाणे त्यांची एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यातील कार्यालयात प्रशासकीय बदली झालेली आहे, असे असताना हे कर्मचारी विविध मार्गाने अतिरिक्त कार्यभाराच्या नावाखाली पुन्हा पुन्हा त्याच मुळ कार्यालयात कामकाज करीत आहे. अशा प्रकारचे अतिरिक्त कार्यभाराचे आदेश हे जिल्हा परिषदेतील काही अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने निर्गमित केले जातात. हे कर्मचारी गेल्या १० वर्षापासून एकाच कार्यालयात कार्यरत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता होण्यासाठी कारणीभूत आहेत. याबाबत अनेक वेळा तक्रारी होऊन सुध्दा अधिकारी वर्ग या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. सदर प्रकरणात लक्ष घालून विविध कारणाने वर्षानुवर्षे एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे हे अतिरिक्त कार्यभाराचे आदेश रद्द करुन त्यांना त्यांच्या मुळ आस्थापनेच्या ठिकाणी कामकाज पाहण्याबाबत आपले स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे, भविष्यात अशा प्रकारच्या प्रशासकीय अनियमितता होवू नयेत, यासाठी ज्या ज्या अधिकारी/ कर्मचारी यांनी असे अतिरिक्त पदभाराचे आदेश काढलेले आहेत, त्या सर्वांवर आपले स्तरावरुन उचित कार्यवाही व्हावी, असेही म्हटले आहे.

# राजे संभाजी उद्योग समूहाच्या वतीने आष्टीतील दहावीच्या परीक्षेत सेम टू सेम



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील जुळ्या बहिणीं अनुष्का देशपांडे,तनुष्का देशपांडे यांनी ९६ टक्के गुण मिळविले व दहावीच्या परीक्षेत अलिशा पठाण हिला ९४ टक्के गुण मिळविले या तिघींनी घवघवीत यश मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उद्योजक अमोल राजे शिंदे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार जावेद पठाण, माजी सरपंच बिबीशन भवर, संभाजी दादा कोकणे, गंगासेठ माजी सरपंच कारखेल ,आजिनाथ घुले ,निहाल पठाण,अंबादास घुले, सलीम पठाण,सुदर्शन फसले सालेवडगाव,आत्माराम आवारे,मुख्याध्यापक शेख इद्रिस सर, तुळशीराम शिंदे तुकाराम भवर बबन दादा शिंदे, शिवाजी तावरे,राजू पवळ ग्रामसेवक,शेख बब्बू गणेश कोकणे ,विकास शिंदे ,पप्पू वाळेकर आदी दिसत आहेत.

# गेवराई शहरातील तय्यबनगरचे नागरिक पीटीआरपासून वंचित

### उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,अमरसिंह पंडित यांना मुस्लिमाचे वावडे का? - सय्यद एजाज

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील संजयनगर आणि साठेनगर येथील अतिक्रमणधारकांना माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १९ मे रोजी पीटीआर वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. मात्र, मुस्लिम बहुल तय्यबनगर भागातील अतिक्रमणधारकांना या योजनेतून जाणीवपूर्वक



वगळल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केला आहे. त्यांनी माजी आ. पंडित आणि ना.अजित दादा पवार यांच्यावर कडाडून टीका

पान ३ वर

# लिटल फ्लॉवर समर कॅम्पच्या माध्यमातून संस्कारक्षम पिढीचे बीजारोपण-शितल स्वामी-गोपीशेट्टी

**बीड । प्रतिनिधी**

लिटल फ्लॉवर समर कॅम्पचे उद्घाटन राज्यस्तरीय खो खो खेळाडू तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ खो खो संघाच्या मा. कर्णधार बीडच्या कन्या शितल विनोद स्वामी-गोपीशेट्टी यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजाला सलामी देऊन भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करुन झाले हे वाचन नऊ वर्ष वय असलेल्या कु. निहारीका संदीप गोपीशेट्टी हिने केले. यानंतर हिच आमची प्रार्थना अन हेच आमचे मागणे



ही विश्व प्रार्थना करण्यात आली. योप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार संचालिका स्नेहा दुधाळ आणि वैदेहि विधाते, पालक प्रतिनिधी सौ. माधुरी पाखरे-सोनवणे यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी सहभागी बालकांनी जोक, गोष्ट याच बरोबर नृत्य आणि अभिनयाचे सादरीकरण केले या कॅम्प मध्ये परिसरातील असंख्य बालकांनी सहभाग नोंदवला. दि. १८ ते २४ मे या कालावधीत चालणार्या या कॅम्प मध्ये सद्यपरिस्थिती पहाता सामाजिक सौहार्द टिकुन राहावे या जाणिवेतून भारत माझा देश आहे ही प्रतिज्ञा फक्त पुस्तकात बंदिस्त न राहता प्रत्यक्ष आचरणात

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...


पुणे विशेष

सोमवार, दि.१९ मे २०२५ । पान ७

# पुढील पाच दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता; पुण्यात येलो तर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील अनेक भागात गेल्या काही दिवसांपासून राज्यात वादळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पुणे शहर परिसरात देखील पावसाने हजेरी लावली. गेल्या दोन तीन दिवसापासून शहरातील वातावरण ढगाळ आहे. पुढील २४ तासांसाठी पुणे जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज असून हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या आठवड्यात पुणेकरांना उकाड्यापासून दिलासा काहीसा दिलासा मिळाला आहे. पुढील पाच दिवस कमाल तापमानात घट होण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे पुणे



शहराला पावसाचा 'यलो' अलर्ट, तर जिल्ह्याला 'ऑरेंज' अलर्ट देण्यात आला आहे.

नैर्ऋत्य मॉन्सूनच्या हालचालींमुळे या आठवड्याच्या सुरवातीपासून शहरात सुरू झालेल्या पावसाने वातावरणात गारवा निर्माण केला होता त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला आहे. शनिवारी दिवसभर ढगाळ हवामान होते.

कमाल तापमानात देखील घट नोंदवण्यात आली होती. मात्र, हवामानात होणाऱ्या बदलांमुळे पुढील पाच दिवस मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे पुणे शहराला 'येलो' अलर्ट जारी आला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये पुढील तीन दिवस तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता असल्याचे हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे. त्यामुळे जिल्ह्यात 'ऑरेंज' अलर्ट देण्यात आला आहे.

पुणे आणि परिसरात कमाल तापमानात किंचित घट झाली आहे. आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोमवारी (ता. १९) आणि मंगळवारी (ता. २०) बुधवारी (ता. २१) कमाल तापमानात अधिक घट होण्याची शक्यता आहे. आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.

# तळेगाव दाभाडे आगारात पाच नव्या एसटी बसगाड्या दाखल

## आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते बसगाड्यांचे लोकार्पण

**तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे एसटी आगारात पाच एसटी बसगाड्या दाखल करण्यात आल्या. मावळ तालुक्यातील नागरिकांना अधिक वेळेवर, सुरक्षित आणि सुटसुटीत सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने तळेगाव दाभाडे बस आगारात नव्याने दाखल झालेल्या पाच एसटी बसगाड्यांचे लोकार्पण आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते रविवारी (दि.१८) संपन्न झाले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मावळ तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, तळेगाव दाभाडे एसटी डेपोचे व्यवस्थापक प्रमोद धायतोंडे, वाहतूक निरीक्षक आकाश जगताप, हरीश कोकरे, प्रकाश हगवणे, विशाल काळोखे, शैलेश चव्हाण आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी लोकार्पणानंतर आगारातील विविध विभागांची पाहणी करत कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मावळ तालुक्यासाठी नव्या बसगाड्यांची मागणी आमदार शेळके यांनी लेखी पत्राद्वारे केली होती. या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत परिवहन विभागाने मावळ तालुक्याला १० नव्या बसगाड्या मंजूर केल्या असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ५ गाड्यांचे लोकार्पण या वेळी करण्यात आले. उर्वरित गाड्या लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

लोकार्पणप्रसंगी आमदार सुनील शेळके यांनी तळेगाव दाभाडे आगारातील व्यवस्थापक, चालक, वाहक, तिकीट निरीक्षक यांच्याशी चर्चा करून आगाराच्या अडचणी, सेवांमधील अडथळे, तसेच प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला. बससेवा अधिक चांगल्या प्रकारे चालाव्यात यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही चर्चा झाली. या नव्या बसगाड्यांमुळे तळेगाव, लोणावळा, पुणे, आंबेगाव, मुळशी परिसरातील प्रवाशांना अधिक नियमित व वेळेवर सेवा मिळणार असून, मावळातील ग्रामीण व शहरी भागांमधील दळणवळण सुलभ होणार आहे.

# तिकीट दरवाढी विरोधात 'आप'चे स्वारगेट चौकात आंदोलन!

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सांभाळणाऱ्या पीएमपीने तिकीट दरात मोठी वाढ केली आहे. संचालक मंडळाने याबाबत ठराव करून बसचा किमान तिकीट दर ५ रुपये ऐवजी १० रुपये केला आहे. तसेच, दैनंदिन पास ४० रुपये वरून वाढवून ७० रुपये केला आहे आणि मासिक पासमध्ये ९०० रुपयावरून तब्बल १५०० रुपयांपर्यंत दरवाढ केली आहे. ही दरवाढ सामान्य पुणेकरांची कंबर मोडणारी आहे. असे सांगत रविवारी (दि.१८) रोजी सकाळी आम आदमी पार्टी तर्फे स्वारगेट चौकामध्ये जोरदार आंदोलन करण्यात आले.




प्रशासनाने वार्षिक तूट कमी करण्यासाठी आणि दर कीफायतशीर सुटसुटीत करण्यासाठी ही दरवाढ केल्याचे सांगितले होते. परंतु या दरवाढीमुळे मुख्यत्वे सामान्य माणूस व रोजंदारीवरील कामगारांना याचा फटका बसून खासगी दुचाकी वाहने घेण्याकडे त्याचा कल राहील. त्यातून अधिकाधिक वाहतूक कोंडी व प्रदूषण होईल. पुणे शहराचा जागतिक वाहतूक कोंडीत चौथा नंबर आहे, असे असताना याविषयी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करणे व अधिकाधिक प्रवासी याचा वापर करतील, यासाठी प्रयत्न करणे हे प्रशासनाचे धोरण असायला हवे. २०१४ पासून दैनिक प्रवाशांचा आकडा हा दहा ते अकरा लाखाच्या दरम्यानच रेंगाळला आहे. असे आम आदमी पार्टी कडून यावेळी सांगण्यात आले.

तूट कमी करण्यासाठी उत्पन्नाचे इतर मार्ग अधिक कार्यक्षमतेने वापरायला हवेत. मेट्रो साठीची एंड माईल कनेक्टिव्हिटी म्हणजे शेवटच्या टप्प्यातील प्रवासाच्या सुविधा द्यायला हव्यात, त्या ऐवजी ती जबाबदारी टाळण्याकडे पीएमपीएमएल आणि मेट्रोचा ही कल आहे. प्रशासनाने भ्रष्टाचार व अकार्यक्षमता असणाऱ्या बाबी दूर करीत अधिक बस रस्त्यावर आणायला हव्यात. यातून पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी होऊ शकते.

सध्या लक्झेमबर्ग, माल्टा, फ्रान्स, इटली, ब्राझील आदी देशांमध्ये सार्वजनिक प्रवास हा मोफत करण्याचे धोरण आहे. आपल्याकडे महानगरपालिका ही तूट भरून काढत असताना म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या सामान्य जनता याचे पैसे मोजत असताना प्रवाशांवर याचा बोजा देण्याची गरज नाही. याबाबतीत जिल्हाधिकारी यांनी प्रवासी संघटना व प्रवासी, राजकीय पक्ष यांची मते घेऊन ही दरवाढ फेटाळावी, अशी मागणी आम आदमी पार्टीतर्फे करण्यात आली आहे, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# पाक इतकाच चीनही भारताचा मोठा शत्रू; निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांचे मत

**पुणे । प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धसंघर्षात चीनने पाकला छुपी मदत केली असून, जवळपास २० अब्ज डॉलरहून अधिक किमतीची शस्त्रास्त्रे पाकला पुरवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे चीनही पाकइतकाच आपला मोठा शत्रू आहे. आपल्या जवानांचे रक्त सांडण्यास चीनही तितकाच जबाबदार असून, भविष्यात ड्रॅगनलाही धडा शिकवायला हवा, असे स्पष्ट मत निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन यांनी येथे व्यक्त केले.



'लोकमान्य मल्टिपर्पज को. ऑप सोसायटी'च्या वतीने 'ऑपरेशन सिंदुर'अंतर्गत भारताने पाकिस्तानला कसा धडा शिकवला?' या विषयावर नवी पेठ स्थित एस. एम. जोशी हॉलमध्ये ब्रिगेडियर महाजन यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'लोकमान्य'चे संस्थापक-अध्यक्ष व तरुण भारतचे समूह संपादक किरण ठाकुर होते.

ब्रिगेडियर महानज म्हणाले, की, युद्धभूमीवर चीनचे बारीक लक्ष होते. भारत व पाक यांच्यातील युद्धसंघर्षात चीनने पाकला मोठी मदत केली. वीस अब्ज डॉलरचा शस्त्रसाठा दिला. तंत्रज्ञान पुरवले. याशिवाय विमानांच्या ट्रॅकिंगसाठीही पाकला त्यांची मदत केल्याचे दिसते. त्यामुळे भारतीय जवानांचे रक्त सांडण्याकरिता चीन देखील तितकाच कारणीभूत आहे, असे म्हणता येईल.

चीनला धडा शिकवण्याची वेळ आली आहे. सर्वप्रथम आपण चीनवर आर्थिक बहिष्कार घालायला हवा. आपले व्यावसायिक मोठ्या प्रमाणावर चीनी उत्पादांनांवर अवलंबून असलेले दिसते. हा आर्थिक चक्रव्यूह भेदला गेला पाहिजे. त्याकरिता चीनी उत्पादनांना प्रतिबंध करायला हवा. चीनी उत्पादने ओळखून त्याऐवजी स्वदेशी अथवा अन्य कंपन्यांचा माल आपण घेतला पाहिजे. पाकिस्तानबाबत बोलताना ब्रिगेडियर महाजन म्हणाले की, भारताविरुद्धच्या तिन्ही युद्धात पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला. आपण भारताविरोधात जिंकू शकत नाही, याची जाणीव झाल्यानेच ते छुप्या युद्धाचा कुबड्या वापरतात. दहशतवादी हल्ले किंवा ड्रोन युद्ध हा त्यातलाच प्रकार. जगाचे लक्ष वेधण्यासाठी पहलगामवर दहशतवादी हल्ला करण्यात आला. मागील काही दिवसांपासून या भागात शांतता होती. दहशतवाद्यांच्या कंबरडे जवळपास मोडल्यात जमा होते. रस्ते, बोगदे व अन्य सुविधा मोठ्या प्रमाणात वाढल्याने पर्यटकांच्या संख्येतही मोठी वाढ झाली होती. त्यात अमेरिकेचे उपाध्यक्षही भारत भेटीवर होते. ही वेळ पाकने साधली. मात्र, भारताने त्याला चोख प्रत्युत्तर दिले.

# २० वर्षांनंतर बैलगाडा शर्यतीप्रकरणी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह ६७ जणांची निर्दोष मुक्तता

**मंचर । प्रतिनिधी**

बंद बैलगाडा शर्यती पूर्ववत सुरू व्हाव्यात. यासाठी २००५ मध्ये मंचर (ता. आंबेगाव) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आलेल्या आंदोलनात सहभागी झालेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी खासदार (स्व.) किसनराव बाणखेले यांच्यासह ६७ बैलगाडा मालक आणि शेतकऱ्यांविरोधात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याप्रकरणी शनिवारी (ता.१७) खेड सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए.एस सय्यद यांनी सर्वांची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे.




लांडेवाडी (ता.आंबेगाव) येथे निकालामुळे तब्बल २० वर्षांनंतर न्याय मिळाल्याची भावना व्यक्त करत आढळराव पाटील बैलगाडा, बैलगाडा मालक व शेतकऱ्यांनी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

पत्रकार परिषदेत बोलताना आढळराव पाटील म्हणाले बैलगाडा शर्यती सुरू व्हाव्यात म्हणून लोकसभेत अनेकदा मुद्दा मांडला. आंदोलनं केली. त्यातून तीन खटले दाखल झाले. त्यातील एका खटल्यात निर्दोष मुक्तता मिळाली आहे. ६७ लोक एका वेळी न्यायालयात उपस्थित राहणे सोपे नव्हते. त्या प्रयत्नात १५ जणांचा मृत्यू झाला. शनिवारी न्यायालयाने सर्वांची ओळखपत्र घेऊन निकाल दिला. यात अँड. गणेश होनराव, अँड. मृणाल पडवळ, , अँड.सोनम नाईकरे,अँड. कोमल बहिरट यांचे विशेष सहकार्य लाभले

# पुण्याची सायेशा गोयल लंडनमधील आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत उपविजेती

**पुणे । प्रतिनिधी**

भारत - सेंट मेरीज ज्युनिअर कॉलेज, पुण्याची १७ वर्षीय विद्यार्थिनी सायेशा राजेश गोयल हिने १२ ते १६ मे २०२५ दरम्यान लंडन, युनायटेड किंगडम येथे इंग्लिश स्पीकिंग युनियन आयोजित आंतरराष्ट्रीय पब्लिक स्पीकिंग स्पर्धेत (खझडउ) भारताचे यशस्वी प्रतिनिधित्व केले.



जगभरातील ४७ देशांमधील १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांमधून निवड झालेल्या सायेशाने भारताच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवले. तिने कापड, भरतकाम आणि पारंपरिक विणकामांद्वारे भारताच्या विविधतेतील एकतेचे सर्जनशील सादरीकरण करत सर्वांचे लक्ष वेधले. स्पर्धेदरम्यान सायेशाला लंडन भ्रमंती आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून वक्तृत्व प्रशिक्षणाचा लाभ मिळाला.

उपांत्य फेरीत तिने उत्स्फूर्त भाषण आणि महात्मा गांधींच्या खरी एकता ही तीव्र परीक्षा सहन करूनही तुटत नाही या विधानावर आधारित भाषण सादर करत अंतिम सहा स्पर्धकांमध्ये स्थान मिळवले. १६ मे रोजी लंडनच्या रॉयल इन्स्टिट्यूशन येथे अंतिम फेरीत सायेशाने शेक्सपियरच्या थश ज्ञपुहरीं श रीश, लींीं पीं हरीं श ारू लश या विषयावर प्रभावी भाषण केले. तिच्या सादरीकरणाला डिप्लोमॅट्स, राजदूत आणि प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. यामुळे सायेशाला उपविजेतेपद मिळाले आणि भारताचे नाव जागतिक स्तरावर उजळले. स्पर्धेनंतर भारताच्या उच्चायुक्त कार्यालयातील सौ. निधी चौधरी यांनी सायेशाची भेट घेऊन तिचे अभिनंदन केले.

# अजित पवार गटाचे बड्या नेत्याच्या सुनेची गळफास घेऊन आत्महत्या, पती, सासू, सासऱ्यांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. अजित पवार गटाचे नेते राजेंद्र हगवणे यांच्या सुनेने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेनंतर तालुक्यात एकच खळबळ माजली आहे. वैष्णवी शशांक हगवणे असं त्यांचं नाव असून हुंड्यासाठी शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप त्यांच्या वडिलांनी केला आहे. या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात पती, सासू, सासऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैष्णवी हगवणे यांनी मुळशीतील भुकूम येथे शुक्रवारी (१६ मे) दुपारी चारच्या सुमारास घरातील बेडरुमचा दरवाजा बंद केला आणि गळफास घेत आत्महत्या केली. दरवाजा न उघडल्याने वैष्णवी यांच्या पतीने दरवाजा तोडला. तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. वैष्णवी यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी उपचार करण्यापूर्वीच मृत्यू झाल्याची घोषणा केली. ससून रुग्णालयात पोस्टमार्टम करण्यात आले. वैष्णवी यांच्या माहेरच्यांनी सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप केला आहे. आहे. वैष्णवी यांचे वडील आनंद ऊर्फ अनिल कस्पटे यांनी पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे आणि नणंदेला अटक केली आहे.

शशांक राजेंद्र हगवणे, लता राजेंद्र हगवणे, राजेंद्र तुकाराम हगवणे, करिश्मा राजेंद्र हगवणे, सुशील राजेंद्र हगवणे यांनी हुंड्यासाठी छळ केला. तिच्या मृत्यूस हेच लोक कारणीभूत असल्याचं तक्रारीत त्यांच्या वडिलांनी म्हटलं आहे. राजेंद्र हगवणे हे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नेते असून त्यांच्या गुन्हा दाखल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे

# गुन्हेगारीवर नियंत्रणास प्राधान्य देणार-संदीप गिल

**बारामती । प्रतिनिधी**

नागरिकांना दिलासा देत गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अधिकाधिक लोकाभिमुख कामावर आपला भर असेल, अशी ग्वाही पुणे जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप गिल यांनी दिली.

बारामती शहर पोलिस ठाण्यात गिल यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुणे जिल्हा पोलिस अधीक्षकपदाचा कार्यभार स्विकारताच दुस-याच दिवशी त्यांनी बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सदिच्छा भेट घेतली. पवार यांनीही त्यांना काही महत्वाच्या सूचना या वेळी केल्या.

त्या नंतर इंदापूर तालुक्यातील तीन पोलिस ठाण्यांना व त्या पाठोपाठ बारामती शहर पोलिस ठाण्याला भेटी देत त्यांनी पोलिस कर्मचारी व अधिका-यांशी थेट संवाद साधला. पोलिसांच्या अडचणींचा आढावा घेत मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबध्द असू अशी ग्वाहीही त्यांनी दिली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलिस निरिक्षक विलास नाळे, चंद्रशेखर यादव, वैशाली पाटील आदी उपस्थित होते. गिल म्हणाले, बारामतीत सुरु असलेले शक्ती अभियान



लवकरच संपूर्ण पुणे जिल्ह्यामध्ये राबवू. याला प्रतिसाद चांगला असून त्या मुळे महिलांविषयक गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. वाहतूकीचा प्रश्न सगळीकडेच जटील बनला आहे. जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनास सोबत घेऊन या वर उपाययोजना कशा करता येतील, याचा प्रयत्न करु.

मालमत्ताविषयक गुन्हे उघडकीस येण्याची टक्केवारी अत्यल्प असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर या बाबत स्वतंत्र पथकांमार्फत तपासाला गती देऊ, असे त्यांनी नमूद केले.सायबर गुन्हेगारी व आर्थिक फसवणूक होऊ नये या साठी जिल्हा पोलिसांकडून नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील, या बाबत लोकांचे समुपदेशन केले जाईल, असेही ते म्हणाले.

# भारतीय सैन्य दलाच्या शौर्यासाठी लोणी-आंबेगाव येथे तिरंगा रॅलीचे आयोजन

**पारगाव । प्रतिनिधी**

लोणी ता. आंबेगाव येथे आज रविवारी सकाळी भारतीय सैन्य दलाने केलेल्या पराक्रमा बद्दल भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीत तिरंगा झेंडे हातात घेऊन भारत माता की जय, वंदे मातरम, इनक्लाब झिंदाबाद च्या घोषणा देत माजी सैनिकांसह शेकडो तरूण, महिला, विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी भारतीय सैन्य दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत परिसरातील तब्बल ४० आजी माजी सैनिक व पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात २७ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. त्यानंतर आपल्या सैन्य दलाने पाकिस्तान मध्ये घुसून अतिरेक्यांचे तळ उद्ध्वस्त केले अनेक दहशतवाद्यांना ठार केले आहे.



भारतीय सैन्य दलाने केलेल्या या पराक्रमा बद्दल भारतीय सैन्य दलाच्या सन्मानार्थ भारतीय जनता पार्टी चे तालुक्याच्या पुर्व भागाचे अध्यक्ष किरण वाळुंज व ग्रामस्थांच्या वतीने या तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते.

याप्रसंगी माजी सैनिक नवनाथ डोके यांनी बोलताना सांगितले की आम्ही देशसेवा केली याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. भारतीय सैन्य दलाचा जगभरात नावलौकिक आहे. युद्ध जन्य परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने सैनिकाची भुमिका बजावली पाहिजे. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी किसनराव गायकवाड यांनी देशासाठी काम करत असलेल्या सर्व सैनिकांचे कौतुक करत असताना सांगितले की आम्ही सर्व भारतीय नागरीक सर्व सैनिकांच्या सदैव पाठिशी आहे. सैनिकांचे कुटुंब हे आपले कुटुंब म्हणुन त्या कडे पाहिले पाहिजे.

यावेळी दिक्षा वाळुंज, हर्षल सुतार, माजी सरपंच उद्धव लंके, माजी सरपंच दिलीप वाळुंज, हुतात्मा बाबु गेणु प्रतिष्ठाण चे अध्यक्ष बाबाजी चासकर, जगन लंके यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमात हुतात्मा बाबु गेणु यांचे पुतणे बबनराव सैद, शहिद सुधिर थोरात यांचे वडील पंढरीनाथ थोरात व पत्नी अश्विनी थोरात, शहिद जयदिप गाढवे यांच्या कुटुंबाचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे परिसरातील तब्बल ४० आजी माजी सैनिक व पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे लौकी येथील शहिद सुधीर थोरात यांचे कुटुंबीय पत्नी, ४ वर्षाचा मुलगा, वडील यांचा सत्कार करण्यात आला तेव्हा त्यांच्या डोळ्यातील अश्रु थांबत नव्हते ते पाहुन उपस्थितांचे डोळे पाणावले.

# मांडवगण फराटा येथे भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे १७ मे २०२५ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मांडवगण फराटा ते वडगाव रासाई रस्त्यावर रोहीदास थोरात यांच्या घराजवळ झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला.

अपघातात सागर संभाजी कोळपे (वय २८, रा. मांडवगण फराटा) आणि यश सुधाकर भिसे (वय १२, सध्या रा. मांडवगण फराटा, मूळ रा. खेडवाडी, ता. गेवराई, जि. बीड) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अनिल बीरा कोळपे गंभीर जखमी झाले. फिर्यादी दादा बाळासो कोळपे (वय ३८, रा. कोळपेवस्ती, मांडवगण फराटा) यांच्या तक्रारीनुसार, डंपर (क्रमांक चक ४२ डएट ७६९६) च्या अज्ञात चालकाने बेफिकीरपणे आणि भरधाव वेगाने वाहन चालवत राँग साईडने पीकअप (क्रमांक चक०३ जए ०६३८) ला जोरदार धडक दिली.अपघातानंतर डंपर चालक घटनास्थळावरून पळून गेला. शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३४१/२०२५ अंतर्गत खझऊ कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/१७७ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नकाते करत आहेत.